
/68


चांदोबा

Vapa

वाचकां…

बालसेवक, इंदोर

मी सातव्या वर्षापासून चंदामामा वाचतो आहे. इंदोरमध्ये चंदामामाचे नियमित वाचक भरपूर आहेत हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. गेल्या २८ वर्षातले सर्व अंक आम्ही जपून ठेवले आहेत. मुलांसाठी इतर बरीच मासिके आहेत, पण त्या सर्वांत चंदामामा जास्त चमकतो, कारण त्यांतल्या गोष्टी आणि पारंपारिक मूल्ये यांचा मनावर होणारा परिणाम दीर्घकाळ टिकतो. आम्हाला खरोखरीच वाटतं कीं, १. चंदामामांतल्या वेद, पुराणें, उपनिषदे व नीतिकथांमुळे मासिक अद्वितीम ठाले. २. बोध कथा, लोककथा, शौर्यगाथा व साहसकथांमुळे त्याचे वेगळेपण दिसते. ३. शंकर व चित्रा यांची आकर्षक चित्रे मासिकाची रंगत वाढवतात. मी आणखीही बरेच लिहू शकेन, तरीही चंदामामाचे गुणगान संपणार नाही!

नीलमणी भाटिया, नवी दिल्ली

नवीन युग व जुन्या काळाशी सांगड घालताना चंदामामाने यशस्वीपणे समतोल राखलेला आहे. चंदामामा हे खरोखरीच एक उत्तम भेटवस्तू म्हणून मुलांना देता येते. आकाशांतल्या चांदोबाप्रमाणे चंदामामाही अक्षय प्रकाश देत राहो!

मिलिंद सामंत, सिंधुदुर्ग

चांदोबाचे अंक वाचनीय आहेतच, शिवाय कथानुरूप रेखाटलेली चित्रे माझे मन खूपच प्रफुल्लित करतात. ग्रामीण भागांनी कात टाकून राहणीमानांत बराच बदल केला आहे, पण चांदोबातील चित्रे, ग्रामीण जीवन, घराच्या रचना हे भूतकालीन ग्रामीण जीवन चिरंजीव ठेवतात. तात्पर्याप्रत जाणाऱ्या गोष्टी, वेताळकथा, सामान्य ज्ञानविषयक माहिती, या दृष्टीने चांदोबाचा मोकळेपणा छान आहे. मला वाटतं, निर्मळ रंजनासोबत ज्ञानवृद्धीप्रत चांदोबा हा एक उत्तम अंक आहे.

कार्तिक भूषण, उडुपी

मी चंदामामाचा भक्त आहे. तुमचे मासिक इतके चांगले असते कीं कोणताही अंक वाचायचा मी चुकवत नाही.



तिळाचा ताड

अशर्फीलाल धनपुरांत राहात होता. तो सावकार होता. लोक त्याला निर्दय म्हणत असत. महावीर नांवाचा एक श्रीमंत गृहस्थ नेहमी म्हणायचा, "माणूस कसा नसावा, याचं उत्तम उदाहरण म्हणजे अशर्फीलाल. म्हणून मी तर नेहमी व्याज न घेता लोकांना कर्ज देतो. गुप्तपणे दान करीत राहातो."

त्या गांवातल्या लोकांना महावीरने शब्द दिला होता कीं त्याला लाखों रुपयांचं येणं बाकी होतं; ती रक्कम मिळाली कीं तो गांवातल्या मंदिरासाठी व शाळेसाठी, दहादहा हजार रुपयांच्या देणग्या देणार होता. पण कांही गांवकरी म्हणत कीं जे त्याच्याकडे कर्ज मागायला जात होते, त्यांना कांहीतरी कारण सांगून तो टाळाटाळ करीत असे. कर्जही नाही आणि मदतही नाही, कांहीच देत नव्हता. अनेक लोकांचे मत होते की महावीर उगीचच लंबेलंबे गप्पा मारतो, तिळाचा ताड करतो, पण कृतीच्या नांवाने शून्य! पण सूरज नांवाच्या एका गरीब शेतकऱ्याचा मात्र महावीरवर विश्वास होता. तो त्याला अगदी परोपकारी, महान, मानत होता. त्या विश्वासाने तो आपल्या मुलीच्या लग्नासाठी महावीरकडे हजार रुपये कर्जाऊ मागायला गेला.

त्यावर महावीर त्याला म्हणाला, "परवाच मी तीन हजार रुपयांची देणगी दिली. काल आणखी एकाला बिनव्याजी दहा हजार रुपये कर्जाऊ दिलेत. आज म्हणशील तर माझ्याजवळ शंभर रुपयेदेखील शिल्लक नाहीत. हे तुझं दुर्दैव आहे बघ!"

नाईलाजाने सूरज अशर्फीलालकडे पैशासाठी गेला. अशर्फीलालने कर्ज दिलं पण एक अट घातली. वर्षाच्या आंत जर रकमेची फेड करता आली नाही तर सूरज आणि त्याची बायको लक्ष्मी यांनी त्याच्याकडे घरी कामाला राहायचे! सूरजने ही अट मान्य केली. पण त्यावर्षी पीक चांगले आले नाही, म्हणून वेळेवर रक्कम कांही परत देता आली नाही.

अशर्फीलालचे कर्ज चुकवण्यासाठी सूरजने



पुन्हां महावीरकडे कर्ज मागितले. महावीरने विचार करुन त्याला म्हटले, "अरे, दुसऱ्यांची मदत घेऊन किती दिवस असे आयुष्य घालवीत बसणार आहेस तू? अशर्फीलालकडे घरकामाला राहा, जन्मभर जेवणखाण, कपडालत्ता, याची कांही काळजी करावी लागणार नाही."

"साहेब, माझी बायको व मी ह्याला तयार आहोत. पण माझा मुलगा शेखर हा मात्र याच्या साफ विरुद्ध आहे. तो थोडासा शिकलेला आहे. तो म्हणतोय, आपण व्यापार करुन पैसे मिळवू आणि कर्जाची फेड करुं. त्यासाठी मला तुमच्या-कडून मदत पाहिजे." "तर मग एक काम कर. शेखरला माझ्या हवाली कर आणि तू अशर्फी-लालकडे नोकरीसाठी राहा. मी त्याला मोठा करीन आणि तुलाही नोकरीतून मोकळा करीन. त्यावेळी सगळे गांवकरी तुझी प्रशंसा करतील. मी अशी दहा कुटुंबाना मदत केलेली आहे. तुझे अकरावे कुटुंब होईल." महावीरने म्हटले.

सूरजने शेखरला महावीरकडे धाडले, आणि तो पत्नीसह अशर्फीलालकडे गेला. शेखरने व्यापार सुरु करण्यासाठी महावीरकडून दहा हजार रुपये मागितले. "अरे, दहा हजारच काय, मी लाख रुपये देईन. पण कुणीतरी दिलेल्या पैशावर धंदा चालत नसतो. हुशारी हीच व्यापाराची खरी पुंजी असते. मी पूर्वी पुराणिक, रंगा आणि भद्र नांवाच्या तिघा गरीबांना आसरा दिला होता, त्यांना शिकवलं, त्यांची लग्ने केली. व्यापाराला सुरुवात करण्यासाठी प्रत्येकाला दहा दहा हजार रुपये सुद्धां दिले. वर्षभरांतच ते धंद्यात नुकसान झालं असं सांगून पुन्हां कर्ज मागायला परत आले. मी पैसे द्यायला नकार दिला, तेव्हां ते जनपुरला गेले आणि तिथे त्यांनी लाखो रुपये कमावले. पण मला मात्र फुटकी कवडीदेखील त्यांनी परत दिली नाही." महावीरने शेखरला सांगितले. त्यावर शेखर म्हणाला, "मी तसा नाही. जी रक्कम तुम्ही द्याल, ती मी व्याजासहित परत करीन."

महावीर त्याला हसून म्हणाला, "मी थोडाच व्याज मागणार आहे? दुसऱ्या कुणालातरी मदत व्हावी म्हणून मी रक्कम परत घेतो. तूसुद्धां जनपुरला जा, त्या तिघांना भेट. तुझी बुद्धिमत्ता आणि चतुराई ह्याचा उपयोग कर. जितकी रक्कम वसूल करता येईल, तेवढी वसूल कर. तेच तुझे भांडवल आहे असं मानून व्यापार सुरुं कर. जेव्हां तुझी कमाई चालू होईल, तेव्हां माझी रक्कम मला परत दे."

शेखर जनपुरला गेला. प्रथम तो भद्रला भेटला,

आणि जे घडलं, ते त्याने त्याला सांगितले. भद्रचा चेहरा संतापाने लाल झाला. तो म्हणाला, "महावीर तिळाचा ताड करतो आहे. वास्तविक त्याने पुराणिक, रंगा व मी, आम्हाला काय दिलं ते माहीत आहे? एकेकाला तीनशे रुपये! शंभर शिक्षणासाठी, शंभर लग्नखर्चासाठी आणि शंभर व्यापारासाठी!"

शेखर त्याला म्हणाला, "मी वसुलीसाठी तुमच्याकडे आलो नाही. महावीरच्या शब्दावर विश्वास ठेवून माझे आईवडील मोलमजुरी करायला लागले आहेत. महावीरच्या शब्दांवर कितपत विश्वास ठेवायचा, हे मला जाणून घ्यायचं होतं, म्हणून मी तुम्हाला तिघांनाही भेटायला आलो आहे. आता मी त्याला धडा शिकवीनच." भद्रने म्हटलं, "तू जर त्याला नक्की धडा शिकवशील असे वचन देणार असशील तर मी तुला माझ्या धंद्यात भागीदारी देईन. पण त्यापूर्वी तुला एक काम करावे लागेल. एका आठवड्याच्या आंत तुला आपल्या आई वडिलांची त्या वेठबिगारीतून सुटका करावी लागेल आणि तुझी हुशारी सिद्ध करावी लागेल."

त्यानंतर शेखर रंगाला भेटला व त्यालाही त्याने जे घडलं ते सांगितलं. आपला संताप कसाबसा आवरत रंगा त्याला म्हणाला, "जर तू महावीरला धडा शिकवण्याचे वचन देणार असशील तर मी तुझ्या आईवडिलांना त्यांच्या वेठबिगारीतून मुक्त करीन. त्यासाठी एका आठवड्याच्या आंत तुला एखाद्या चांगल्या कुटुंबातल्या मुलीशी लग्न करावे लागेल व तुझी हुशारी सिद्ध करावी लागेल."



शेवटी शेखर पुराणिकला भेटायला गेला. तो जेव्हां पन्नास वर्षांचा होता, तेव्हां त्याची पत्नी वारली होती आणि त्याने दुसरे लग्न केलं होते. आता त्याची मुलगी मोठी झाली होती. पुराणिकला मुलीचे लग्न लौकर करायचे होते. कारण सावत्र आईचे तिच्याबरोबर रोज खटके उडत असत. शेखरला बघून पुराणिकला तो योग्य व लायक वाटला. आपल्या लेकीचे लग्न ह्याच्याबरोबर व्हावे, अशी इच्छा त्याच्या मनांत उत्पन्न झाली. म्हणून त्याने सांगितले, "माझ्या मुलीचे लग्न मी तुझ्याशी करून देईन. पण एका आठवड्याच्या आंत तुला महावीरला धडा शिकवावा लागेल आणि तुझी चतुराई सिद्ध करून दाखवावी लागेल."

शेखर विचारांत पडला. खूप डोकेफोड केल्यानंतर त्याला एक उपाय सुचला. त्याने



पुराणिकला सांगितल्यावर तो एकदम खूष झाला. त्याने त्याला तीन हजार रुपये दिले. शेखर धनपुरला परत गेला आणि महावीरला म्हणाला, "पुराणिक, रंगा आणि भद्रचे म्हणणे आहे कीं आपल्याकडून त्यांनी प्रत्येकाने तीनशे रुपये घेतलेले होते. व्याजासकट आपल्याला त्यांनी हजार रुपये देऊन मला जबरदस्तीने तुमच्याकडे धाडले. त्यांनी असंही म्हटलंय कीं जर तुम्ही हे पैसे घ्यायला नकार दिलात, तर ते इथे येऊन गांवात सर्वांना सांगतील."

असं म्हणून त्याने तीन हजार रुपये त्याच्या हातांत ठेवले. महावीरला वाटलं कीं ते तिघे इथे येतील आणि खरोखरीच सर्वांना सांगत सुटतील. तो शेखरला म्हणाला, "हे मात्र आणखी कुणालाही सांगू नकोस."

"तुम्ही माझे आदर्श आहात. तुम्ही जसे करता तसेच मी करीन." शेखरने म्हटलं. महावीरला आनंद झाला. त्यानंतर शेखर गांवातल्या कांही प्रमुख लोकांना भेटून म्हणाला, "महावीर तिळाचा ताड करतात हे अगदी खोटं आहे. खरं तर त्यांनी कुणाला तरी तीस हजार रुपये दिले होते, तरी ते गप्प बसले होते. मी ती रक्कम मोठ्या मुश्किलीने वसूल केली. व्याजासहित लाख रुपये आता त्यांना मिळाले आहेत त्यामुळे खूष होऊन त्यांनी माझ्या आईवडिलांना वेठबिगारीतून मोकळे करायचे वचन दिलेले होते. मला नोकरी देऊन माझ्या लग्नाचीही जबाबदारी घ्यायचं त्यांनी कबूल केलेलं होतं. तेव्हां आता मला कसलीच चिंता नाही."

ही बातमी महावीरला कळली. तो घाबरला आणि शेखरला म्हणाला, "अरे तू मला फक्त तीन हजार रुपयेच दिले होतेस. आणि गांवात सांगतो आहेस लाख रुपये म्हणून! तुझ्या या उपकाराबद्दल मी कांहीही म्हटलं नव्हतं. पण गांवात तू सांगितलंस कीं मी तुला मदत करणार आहे. दानधर्माच्या नांवाखाली लोकांनी मला लुटावं अशी तुझी इच्छा आहे कीं काय? मी तुझा हा खोडसाळपणा चालवून घेणार नाही. तू जे खोटं सांगतो आहेस, ते मी सर्वांना सांगीन." त्याने धमकी दिली.

तेव्हां शेखर अगदी नम्रपणे म्हणाला, "मी आपल्याला सांगितलं होतं कीं तुम्ही माझे आदर्श आहात. तुम्ही करता तसंच मीही करीन. आता आपण पुराणिक, रंगा व भद्र यांना फक्त तीन तीनशे रुपये दिलेले होतेत आणि गांवात सर्वांशी पिटवलीत कीं तुम्ही लाखलाख रुपये दिलेत. याचा हाच अर्थ झाला ना, कीं तीनशे रुपये म्हणजे लाख रुपये! तिळाचा ताड करायची तुमची रीत आहे. मी तीच पद्धत स्वीकारली. मला वाटलं कीं उलट तुम्ही माझं कौतुक कराल. माझे बोलणे पटले नसेल तर तुम्ही जरूर गांवात तसं सर्वांना सांगावं!"

शेखर खोटे सांगतोय असं सांगायला जावं तर महावीरचं बिंग फुटलं असतं. म्हणून तो गप्प बसला. इतकंच नव्हे, तर त्याने मंदिराला व शाळेसाठी ज्या देणग्या पूर्वी जाहीर केल्या होत्या, त्याही पूर्ण केल्या. तो स्वतःशीच बडबडत होता, "आता तरी बुद्धी चांगली असू दे माझी! ही तिळाचा ताड करायची संवय सुटली पाहिजे."

तितक्यांत पुराणिक, रंगा आणि भद्र धनपुरला आले. महावीरला चांगला धडा मिळाला, हे ऐकून त्यांना फारच आनंद वाटला. भद्रने शेखरला आपल्या धंद्यात भागिदारी दिली. रंगा आणि भद्रने अशर्फीलालचे कर्ज चुकवले, आणि सूरज आणि त्याची पत्नी यांना वेठबिगारीच्या कामांतून मोकळे केले. पुराणिकने आपल्या मुलीचे लग्न शेखरशी लावून दिले.

जनपुरला जाण्यापूर्वी शेखरने एक मोठी मेजवानी दिली आणि म्हटले, "माझ्या जीवनांत आज हा मोठा बदल घडून आला, त्याला कारण केवळ महावीरजी आहेत."

"अरे शेखर, तिळाचा ताड करू नकोस बरं कां! ही संवय चांगली नसते," महावीर पाठीमागून जोरांत म्हणाला.



हाच माझा त्राता आहे. "असं म्हणून भक्ती-भावनेच्या भरांत त्याने जमिनीवर अंग टाकले.

"गुरुजी, हा दुष्ट असला तरी निस्सीम भक्त आहेस दिसतंय." राजाने आश्चर्य व्यक्त केले.

तितक्यांत दाराजवळ गलका, गोंधळ चालूं असलेला ऐकूं आला. सेनापती तिकडे गेला. दोन सैनिक धापा टाकीत येऊन त्याच्यासमोर उभे राहिले. राजाने इशारा करीत म्हटले, "या, आंत या. काय झालं?"

"नगरांतले तरुण लोक भिकाऱ्यांना पकडून 'तुम्ही मांत्रिकाचे शिष्य आहात कां? खरं काय ते सांगा" असं त्यांना मारझोण करीत विचारत आहेत.

"आम्ही त्या भिकाऱ्यांना वांचवायला गेलो, तर आम्हालाही त्यांनी तडाखे हाणले." सैनिकांनी सांगितले.

"काय झालं?" राजाने सेनापतीकडे बघितलं.

"ब्राम्हदंडीचे दोन्ही शिष्य भिकाऱ्याच्या वेषांत शहरांत हिंडत आहेत. आता हे खरं कीं खोटं आहे, तें ... सेनापतीने सांगितलं.

जमिनीवर पडलेल्या मांत्रिकाला लाथेने हालवीत राजगुरुने म्हटलं, "उठ, उठ, ब्राम्हदंडी, तू ही बातमी ऐकलीस कां? तू त्या शिष्यांना भिकाऱ्याच्या वेषांत असले तरी ओळखशील कां?"

हे ऐकून ब्राम्हदंडी लगेच उठून उभा राहिला. तो म्हणाला, "ऐकावं महाराज, मी त्यांना भिकाऱ्याच्या नव्हे, तर राजाच्या वेषांतदेखील ओळखूं शकेन."

तोपर्यंत मंत्री निमूट बसलेला होता. पण हे ऐकून तो म्हणाला,

"तर मग महाराज, शहरांतल्या साऱ्या भिकाऱ्यांना इथे घेऊन येऊं कां?"

राजाने मान डोलावून होकार दिला, आणि मंत्री व सेनापती दालनाच्याबाहेर गेले. त्यांची आज्ञा झाली आणि नगरांतल्या सगळ्या रस्त्यावरच्या भिकाऱ्यांना पकडण्यासाठी सैनिक निघाले.

(क्रमशः)





वेताळ-
कथा

राजाच्या सुना

...शब्दांचा पक्का विक्रमार्क पुन्हां ...झाडाजवळ गेला. त्याने शव खाली उतरवलं, खांद्यावर घेतलं आणि स्मशानाचा मार्ग धरला. तेव्हां प्रेतांत लपलेल्या वेताळाने म्हटले, "राजन, इष्ट कार्य सिद्ध करण्यासाठी तू अतिशय कष्ट झेलतो आहेस. त्याचं मला कौतुक वाटतं. पण कोणत्याही कार्याची सिद्धी केवळ सहनशक्ती व अथक् परिश्रम यांच्यामुळेच होऊं शकते. त्यासाठी विवेक, वाक्चातुर्य, लोकज्ञान, हेही आवश्यक असते हे विसरुं नकोस. हे गुण तुझ्यांत आहेत कां त्याचा अगोदर विचार कर. त्यासाठी मी तुला एका राजाच्या तीन सुनांची



गोष्ट सांगतो, त्यांची गोष्ट तुला मार्गदर्शक ठरेल व तुझा थकवाही कमी होईल." आणि वेताळाने पुढील गोष्ट सांगितली.

"महेंद्रपुरीच्या राजाला मूलबाळ नव्हते. राजा व राणीने अनेक नवस केले, तीर्थयात्रा केल्या व दानधर्म केला होता. शेवटी आपल्या नशिबांत संतान प्राप्ती नाही, हे सत्य त्यांनी स्वीकारले.

अशा वेळी, एका रात्री राणीला स्वप्नांत पंचमुखी नागराजाचे दर्शन झाले. त्याने राणीला म्हटले,

"तुमच्या मंदिराच्या आवारांत काळ्या दगडाची नागप्रतिमा स्थापन कर आणि तू त्याला चाळीस दिवस दुधाचा अभिषेक केलास तर तुला मूल होईल."

सकाळी उठल्यानंतर राणीने राजाला आपले स्वप्न सांगून म्हटले, "आपल्या इष्टदेवाने, नागराजाने जे सांगितलंय, तसंच आपण करूं या."

आठवड्याभरांतच राजाराणीने पर्वताच्या नागेंद्रमंदिराच्या आवारांत नागाच्या प्रतिमेची विधीपूर्वक स्थापना केली. दोघांनी मोठ्या भक्तिभावाने चाळीस दिवस पूजा करून दुधाचा अभिषेक केला. चाळीसाव्या दिवशी एक अनोळखी विचित्र दिसणारा माणूस राणीकडे आला. तिने यापूर्वी त्याला कधीही बघितलेले नव्हते. तो उंच, काळाकभिन्न व हाडकुळा होता. त्याच्या खांद्यावर एक पिशवी लटकत होती. त्यांतून त्याने तीन आंबे काढले आणि ते राणीला देऊन तो तिला म्हणाला, "राणीसाहेब, तुम्ही मंदिरांत जा आणि तिथे हे आंबे खा. तुम्हाला तीन सुंदर पुत्र होतील."

राणीने श्रद्धापूर्वक अंतःकरणाने ती फळें हातांत घेतली. नंतर मंदिरात जाऊन ती खाल्ली. नऊ महिन्यांनंतर राणीला तीन सुंदर पुत्र झाले. राजाने त्यांची नांवे जय, विजय व अजय ठेवली. राजवाड्यामध्ये मोठ्या प्रेमाने त्यांचे पालनपोषण सुरू झाले.

तिघे राजकुमार हुशार, देखणे व पराक्रमी होते. त्यांनी सर्व विद्या शिकल्या. राजाने तिघा मुलांची लग्नें एकाच मुहूर्तावर केली. तिघी सुना राजाच्या पदरी असणाऱ्या मांडलिक सरदारांच्या मुली होत्या.

असे दिवस जात होते. राजाची प्रकृति दिवसेंदिवस खालावत होती. म्हातारपणामुळें तो अशक्त झाला होता. आता प्रकृतीत फारशी सुधारणा होण्याची शक्यता नाही, असे राजवैद्याने स्पष्ट सांगितले. आता राजाच्यासमोर एक गंभीर समस्या उभी राहिली. या तिन्ही अगदी सारख्या गुणांच्या व योग्यतेच्या युवराजांपैकी कुणाला गादीचा वारस नेमावे हे कांही राजाला सुचेना.

राजाने खूप विचार केला आणि राजाची अचूक निवड करण्याची जबाबदारी आपल्या प्रधानमंत्री चंद्रशेखर ह्याच्यावर सोपवली.

दुसऱ्या दिवशी प्रधानमंत्र्याने युवराजांची हर प्रकारे परीक्षा घेतली. पण प्रत्येक विषयांत तिघांची सारखीच गुणवत्ता होती.

परीक्षा घेतल्यानंतर मंत्री राजाला म्हणाला,

"महाराज, तिघेही राजकुमार सिंहासनावर बसायला योग्य आहेत. त्यांच्यापैकी एकाला राजा निवडणं म्हणजे इतर दोघांच्यावर अन्याय करण्यासारखं आहे."

त्यावर विचार करून राजा म्हणाला,

"प्रधानजी, हा प्रश्न जास्तच कठीण होऊं लागला आहे. आता आपण काय करायचं?"

मंत्र्याने एक दीर्घ श्वास घेऊन म्हटले, "महाराज, एक उपाय आहे. जर आपण अनुमती दिलीत, तर आपल्या तिन्ही सुनांशी मला आपल्याबरोबर वेगवेगळ्या वेळी भेटायचंय. व त्यांना एक प्रश्न मला विचारायचा आहे.

त्यांची जी उत्तरे असतील, त्यावरून आपल्या



निश्चित राजगादीसाठी निवडीचा प्रश्न सुटेल असं मला वाटतं."

राजा मंत्र्याला म्हणाला,

"जे कांही करायचा हवं, ते आता तुम्ही लौकर करा. म्हणजे माझ्या डोक्यावरचा एक भार कमी होईल."

असं म्हणून त्याने आपल्या मुकुटाकडे बोट दाखवले.

त्यानुसार राजाच्या आज्ञेवरून जयची पत्नी प्रथम दालनांत आली. तिथे राजा व मंत्री, दोघेही बसलेले होते. मंत्र्याने तिला प्रेमळ स्वरांत विचारले,

"देवी, तुमच्या पतीला जर राजा म्हणून निवडले नाही, तर तुम्ही काय कराल?"

जयच्या पत्नीच्या चेहऱ्यावर निराशा स्पष्ट



दिसत होती. तिने दबल्या आवाजात म्हटलं,
"कोणत्याही देशाचा राजा होणे ही भाग्याची गोष्ट आहे. जर माझ्या पतीच्या भाग्यांत ते नसेल तर मी गप्प बसेन."

ती गेल्यानंतर विजयची पत्नी आंत आली. तोच प्रश्न तिला विचारण्यांत आला. त्यावर ती कोरड्या स्वरांत म्हणाली,

"काय करणार? मी मनांतल्या मनांत कुढत राहीन कीं आजपर्यंतच्या माझ्या भक्तिभावांत कांही कमी असेल म्हणून देवानं माझं ऐकलं नाही."

शेवटी अजयची पत्नी आली. मंत्र्याने तोच प्रश्न तिला विचारल्याबरोबर तिने दुसऱ्याच क्षणीं ताडकन उत्तर दिलं,

"प्रधानमंत्रीजींच्या मनांत असे विचार आले तरी कसे? माझे पती राजा बनतील ह्याबद्दल प्रश्नच नको. मला त्यांची कुवत, शक्ती, बुद्धी व चतुराई माहीत आहे. प्रयत्न करूनही, जीवनांत त्यांची कधी हार होणार नाही."

ती परत जाताच मंत्र्याने राजाला सांगितले, "महाराज, अजयची राजा म्हणून आपण घोषणा करावी."

वेताळाने ही गोष्ट सांगून राजा विक्रमार्काला विचारले,

"राजन्, मंत्र्याने जो सल्ला राजाला दिला होता, तो मला तरी तो अविचारी व अयोग्य वाटतो. सुनांची परीक्षा एकाच प्रश्नाने घेऊन मुलांची योग्यता कशी ठरवायची?

थोरल्या दोन्ही सुना विनयशील होत्या. पण धाकटी मात्र निराळी आहे. मोठ्यांचा अनादर

जाणून बुजून करणारी, अहंकारी, व बोलण्यांत वटवटीत आहे, म्हणून तिला असं वाटतं कीं आपला पती श्रेष्ठ होय ना?

मंत्र्याच्या मनांत शंका आली असेल कीं जर तिच्या पतीची निवड केली नाही, तर ती आपल्या नवऱ्याला बंडाळी करायला लावेल. या भीतीपोटी घाबरून जाऊन तर मंत्र्याने राजाला गैरसल्ला दिला नाही ना?

माझ्या या शंकेची उत्तरे माहीत असूनही जर तू मौन पत्करलेस, तर तुझ्या मस्तकाची शंभर शकले होऊन खाली पडतील."

ह्या प्रश्नांना उत्तर देताना विक्रमार्काने म्हटलं, "प्रथम हे स्पष्ट आहे की तिघेही राजकुमार समान योग्यतेचे आहेत. त्यांच्या मनांत स्पर्धा नाही किंवा आपणच सिंहासनावर बसावे, असाही आग्रह दिसत नाही. पण पुरुषाच्या वागण्यावर व विचारावर पत्नीचा थोडाफार प्रभाव अवश्य असतो. म्हणून मंत्र्याने राजाच्या सुनांची मानसिकता जाणून घेण्याचा प्रयत्न केला. व त्यानुसार त्याने विचारपूर्वक निर्णय घेतला.

तिन्ही सुना नम्र आहेत. जयची पत्नी सहन-शील स्त्री आहे. ती परिस्थितीशी संघर्ष करणारी नाही. समझोता करणारी आहे.

विजयची पत्नी देवावर विश्वास ठेवणारी, म्हणून ती सर्व भार देवावर टाकणारी आहे

परंतु अजयची पत्नी मात्र निराळी आहे. पतीचा आत्मविश्वास व धाडसीपणा वाढवण्याचे कौशल्य तिच्या स्वभावांत आहे.

आणि हे गुण राजामध्ये अवश्य हवेत. त्याचा स्वतःवर विश्वास असायलाच हवा. आणि त्यांत धर्मपत्नीचा सहयोग व प्रोत्साहन असले तर फारच उत्तम.

म्हणून मंत्र्याने तशी निवड केली, त्याने उगीच घाबरून जाऊन केलेली नाही."

राजाचे मौनभंग करण्यांत वेताळ सफल झाला होता, म्हणून तो शवासहित गायब झाला आणि पुन्हां त्या झाडावर जाऊन बसला.

(कामेश पांडेंची रचना)







म्युझियमचा सन्मान

मुंबईतले दीडशे वर्षांचे व्हिक्टोरिया व आल्बर्ट म्युझियम हे युनेस्कोकडून उत्कृष्ट व्यवस्थेबद्दल सन्मानित केले गेले आहे. सांस्कृतिक वारसा जतन कार्यक्रम २००५ यांच्या आशिया–पॅसिफिक पुरस्कारातर्फे हा सन्मान आहे.

हे म्युझियम १८५५ साली भाऊ दाजी लाड यांनी सुरू केले, पण त्याला महाराणी व्हिक्टोरिया व त्यांचे पती प्रिन्स आल्बर्ट यांचे नांव देण्यांत आले. म्युझियमची व्यवस्था कालांतराने मुंबई महानगरपालिकेकडे आली, तेव्हा त्याच्या व्यवस्थेला जरा दुरवस्था प्राप्त झाली. १९९६ मध्ये 'इंटाक' - इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज–यांच्यातर्फे म्युझियममध्ये सुधारणा करून वस्तूंचे जतन करण्यासाठी एक प्रयोगशाळादेखील असावी अशी सूचना मांडण्यांत आली.

ही सूचना स्वीकारली गेली आणि त्यासाठी जमनालाल बजाज फाऊंडेशनची मदत घेण्याचे ठरले. म्युझियमची डागडुजी व सुधारणांचे काम त्याला १५० वर्षे पूर्ण होत आहेत त्यावेळीच पूर्ण करण्यांत आले. जर सर्व दालनांतून आता एक नीट फेरी मारली तर अरबी भाषेतल्या कथांमधल्या चित्ताकर्षक वातावरणांत गेल्यासारखे वाटेल, असं म्हणतात.

मध्यंतरी जीर्ण वाटणारी ही इमारत आता भाऊ दाजी लाड या नांवाने ओळखली जाणार आहे.

राजा परत आला

चोळ देशांत मंगलापुरम नांवाचे एक संस्थान होते. त्यांचा राजा राजरत्नम हा चोळ सम्राटाचा मांडलिक होता. तो नियमित खंडणी देत असे, त्यामुळे त्याचे संस्थान शांत व समाधानी होते. तो भाग सुपीक होता, दरवर्षी पीक चांगले येत होते. नागरिक जो कर देत होते त्याने राज्याची संपत्ती वाढत होती. राजरत्नम दिलदार राज्यकर्ता होता. तो चित्रकार, कवी, तंत्रकार यांना उदार आश्रय देत असे.

राजाचा धाकटा भाऊ मणीरत्नम याला कलाकारांच्यावर केलेला हा असा खर्च पसंत नव्हता. जर राजरत्नमनंतर मणीरत्नम राजा झाला तर त्याला रिकामा खजिना मिळेल, अशी त्याला सतत भीती वाटत होती. दिवस जात होते तसी मणीरत्नमची लोभी इच्छा वाढत होती. त्याच्या यशाच्या मार्गात भावाचा अडथळा होता, आणि तो काढायला हवा होता. परंतु त्याला स्वतः तो गुन्हा करायचा नव्हता. त्यासाठी कुणा दुसऱ्याला शोधायला हवा होता. राजरत्नमच्या सहवासांत असलेल्या लोकांमधे ही कल्पना मणीरत्नमने पसरवली.

त्याने राजवाड्यांतल्या मुख्य आचाऱ्याला हे काम करण्यासंबंधी विचारले. पण 'रोज पंगतीला पाहुणे असतात', म्हणून तो राजाच्या जेवणांत विष घालूं शकत नव्हता. इतर कुणी त्यामुळे मरण पावले आणि आचारी पकडला गेला असता, तर त्याला मृत्युदंड निश्चित होता.

शेवटी, मणिरत्नमने राजाच्या न्हाव्याला हे कृत्य करण्यास राजी केले. पण न्हाव्याने त्यासाठी पैशाचे इनाम घेण्याचे नाकारले. दुसऱ्या दिवशी राजाची दाढी करताना न्हाव्याने राजाला या कटाची माहिती दिली. राजरत्नम स्तब्ध झाला.





त्यानंतर न्हाव्याने राजाच्या कांही सेवकांना विश्वासांत घेतले, तेही राजरत्नमशी बेईमानी करण्यास तयार नव्हते, हे त्याच्या लक्षांत आले.

ही बातमी साऱ्या दरबारात समजली. पण राजाने सर्वांनाच धक्का दिला. त्याने राजगादीवर भावाला बसवून आपण वनांत राहायला जायचा आपला निर्णय जाहीर केला.

"मला आता राज्यकारभाराचा वीट आला आहे. कांही काळ वनांत राहायला जावे व ध्यानधारणा करावी असे मला वाटते. माझ्या जागी माझा भाऊ मणीरत्नम हा राजा होईल."

कांही दरबारी मंडळींनी राजाने असा मूर्खपणा करूं नये, म्हणून त्याची विनवणी केली. राजाने त्यांना सांगितले, "एकांतवास मिळाला कीं आजपर्यंत मी स्वतः किती मूर्खपणा केला आहे, हें मला समजेल." त्याने मणीरत्नमला बोलावून घेतले आणि दरबारांतल्या सर्वांसमक्ष कोणताही समारंभ किंवा धार्मिक विधी न करता भावाला आपला मुकुट दिला.

दुसऱ्याच दिवशी राजा अरण्यांत निघून गेला. मणिरत्नम किती दुष्ट व पाताळयंत्री आहे हे नागरिकांना लौकरच कळून चुकले. त्यापूर्वीही तो लोकप्रिय नव्हताच. यानंतर मणिरत्नम काय करील याकडे लोकांचे डोळे लागले होते. मणीरत्नम पहिले कांही दिवस फारच खुषींत होता. पण इतरांचे चेहरे त्याला कांही प्रसन्न दिसत नव्हते. आदी त्याचे सेवकसुद्धां गंभीरपणे नव्या राजाच्या आज्ञांचे पालन करीत होते. मणीरत्नमला वाटले कीं आपण राजवाड्यांतच बसून राहावे, म्हणजे लोकांकडे बघायलाच नको.

लोकांच्या चेहऱ्यावरचे भाव बघून त्याच्या मनांत आले कीं जसा त्याने भावाच्या विरुद्ध कट केला, तसा इतर कुणीतरी त्याला ठार मारून पुन्हां राजरत्नमला आणायचाही बेत करीत असेल. तेव्हां मणिरत्नम जर सुरक्षित राहायला हवा असेल, तर भावाचा मृत्यू व्हायलाच हवा होता. वास्तविक राजरत्नम अरण्यांत जाऊन जपतप व साधनेंत गर्क होता. मणीरत्नमने, भावाचा कांटा काढणाऱ्या माणसाला अर्धे राज्य देऊं केले. पण कुणीही त्यासाठी पुढे आले नाहीत. त्याला मदत करायला कुणीच तयार नव्हते.

एके दिवशी, एक गरीब कवी दरबारांत आला. राजरत्नम अरण्यांत गेल्यापासून मंगलापुरमच्या लोकांना चांगल्या किंवा नवोदित कविता ऐकण्याची संधी मिळाली नव्हती. या कवीने दरबारांत येऊन आपले काव्यवाचन करण्याची राजाकडे परवानगी मागितली. काव्याचा विषय होता राज्याच्या इतिहास. जेव्हां मणीरत्नमला समजले कीं, त्यांत त्याच्या स्तुतीपर अशी कांही कवने नव्हती, तेव्हां तो त्याला म्हणाला,

"मला तुझी कविता मुळीच ऐकायची नाहीं. त्याऐवजी, तू अरण्यांत जा आणि माझ्या भावाचे मस्तक घेऊन ये. त्यासाठी मी तुला अर्धे राज्य बक्षीस देईन."

त्या कवीला क्षणभरदेखील दरबारांत थांबवेना. तो अरण्यांत कांही निराळ्या कारणासाठी गेला. तो राजरत्नमला भेटला आणि काय घडले तेही त्याने सांगितले. त्याने त्या माजी राजाला सांगितले की त्याच्या राज्यांत पूर्वी कवि, चित्रकार यांना मान होता. पण ह्या नव्या राजाला मंगलापुरमच्या इतिहासासंबंधीचे काव्य ऐकण्याची-देखील इच्छा नव्हती.

ह्या परिस्थितीत आपण कांहीच करूं शकत नाहीं, पण तो पुढे म्हणाला, असे राजरत्नमने त्याला सांगितले.

"मित्रा, तुला एक गोष्ट करता येईल. ही माझी तलवार घे. माझे मस्तक छाटून माझ्या भावाला ते नेऊन दे. म्हणजे तुला अर्धे राज्य बक्षीस मिळेलच."

कवीला धक्काच बसला. "महाराज, हे काय सांगता? माझे कुटुंब आणि मी उपाशी मेलो तरी हरकत नाही, पण मी हे असले अधम कृत्य करणार नाही. मला क्षमा करावी, महाराज." असे म्हणून कवी घरी गेला, आणि राजरत्नमशी झालेल्या भेटीबद्दल एक दीर्घकविता लिहून त्याने ती मणिरत्नमकडे पाठवली. त्या कवितेंत शेवटी त्याने असें म्हटले होते,

"मस्तकहीन मंगलापुरमने एक मस्तक विकत मागितले. ते मस्तक स्वतःला विकायला



तयार झाले, कारण त्यामुळे एका दरिद्री कवीला मदत झाली असती. पण राज्याच्या सेवेसाठी तो कवीही आता आपले मस्तक देण्यास तयार आहे.''

ही कविता वाचून मणिरत्नमला एकदम उपरती झाली. कुणीही त्याच्या त्या उदार मागणीला होकार द्यायला तयार झाले नाही. त्याच वेळी, भावाला रागावण्याऐवजी राजरत्नम उलट आपले मस्तक देण्यास तयार झाला होता! त्याने घोडा तयार ठेवायला सांगितला.

''राजा झाल्यानंतर तो प्रथमच राजवाड्याच्याबाहेर पडत होता. मणिरत्नम घोड्यावर स्वार होऊन, हातांत शस्त्र न घेता, अरण्याकडे चालला. त्याचा भाऊ जीर्ण कपडे, दाढी वाढलेली, अशा अवतारांत त्याला दिसला. मणिरत्नमने राजरत्नमच्या पायावर डोके ठेवले आणि क्षमा मागितली.

''दादा, त्या कवीने माझे डोळे उघडले. तू गादीवर असताना माझ्या मूर्खपणामुळे मी तुला मारण्याचा प्रयत्न केला. शिवाय तुझे मस्तक आणून देणाऱ्यास अर्धे राज्य इनाम देण्याची मी घोषणाही केली, तो तर मूर्खपणाचा कळसच होता. कृपा करून तू परत ये. तू मला दिलेले राज्य, तू परत घे आणि तूच गादीवर बैस. मंगलापुरमचा साधा नागरिक म्हणून राहाण्याची देखील माझी लायकी नाही. मला क्षमा कर. दया कर।''



मणिरत्नमने भावाला घोड्यावर बसण्याची विनंती केली आणि तो स्वतः त्याच्यामागे बसला.

राजवाड्याच्याबाहेर नेहमीसारखे राजाचे दर्शन व्हावे, म्हणून गर्दी जमलेली होती. लोकांचा लाडका राजा राजवाड्यांत परत येताना पाहून लोकांना फारच आनंद झाला. त्यांचा जयजयकार ऐकून वाड्यांतले लोक बाहेर प्रांगणात आले, आणि त्यांनी राजरत्नमचे मनःपूर्वक स्वागत केले.

मणिरत्नमने भावाचा हात धरून त्याला दरबारांत नेले, त्याच्या हातांत राजमुकुट देऊन त्याने राजरत्नमला गादीवर बसवले. तो स्वतः भावाच्या पायाशी जमिनीवर बसला. उपस्थित मंडळींच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.

खास बातम्या

हत्तींची ई-नोंदणी



केरळमधे सुमारे ८०० हत्ती पकडलेले आहेत ८० टक्के हत्तींच्या मालकांची माहिती किंवा त्यांच्या हालचाली यांची नोंद सापडत नाही. पण आता यानंतर ही अडचण पडणार नाही. या प्राण्यांच्या कानाडीखाली मायक्रो चिप्स् बसवण्यांत येतील. ही योजना २००३ सालीच मान्य झाली होती, पण चिप्स् मिळत नव्हत्या, त्यामुळे हे काम थांबले. आता १२०० मायक्रोचिप्स् राज्यांत पाठवले आहेत. त्या चिप्स् बसवून काम सुरू झाले की खास यंत्राच्या मदतीने माहिती नोंदली जाईल. त्यावरून अधिकाऱ्यांना प्राण्यांची वर्तणूक व वृत्तीचा अभ्यास करता येईल. त्यांना होणारे रोग, त्यावर केले जाणारे उपाय, लसीकरण, व इतर सर्व नोंदी उपग्रहावरच्या नियंत्रण केंद्रात पोचतील. आता १४ जिल्ह्यांतल्या हत्तींसाठी ही पद्धत वापरली जाणार आहे.

लेखनाचा विक्रम



टी. कविता ही चेन्नईमधली एक कॉलेजकुमारी, टेबलापाशी बसली आणि फुलस्केप कागदाचे ढीग घेऊन ती लिहीत बसली. सव्वीस तासानंतर ती उठली तोपर्यंत तिने ३१२ पाने (एका बाजूला) लिहून काढली आणि एक नवा विक्रम झाला. यापूर्वीचा अखंड लेखनाचा विक्रम २४ तासांचा होता. कविताचे नांव भारतीय ''लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस'' मधे निश्चित नोंदले जाईल.



गोविंदची हुशारी

गोविंद एक साधा शेतकरी होता. त्याच्याकडे बैलांची एक जोडी होती. एक दिवस तो शेतांतले काम संपवून घरी परत आला. नंतर त्याने बैलांना चारापाणी दिले आणि गोठ्यांत बांधून ठेवले. पण, जेव्हा सकाळी उठून तो जेव्हां गोठ्याकडे गेला, तेव्हा तिथे त्याला एकच बैल उभा दिसला. दुसरा बैल कुठे गेला असेल ते त्याला समजेना. तो काळजीत पडला. त्याने खूप शोधाशोध केली, पण दुसऱ्या बैलाचा पत्ता लागला नाही.

पावसाळा तोंडावर आला होता. जमीन नांगरायची होती, पण एका बैलाने कसे काम झाले असते? ते जमण्यासारखे नव्हते. म्हणून गोविंदने गुरांच्या बाजारात जाऊन एक बैल विकत घ्यायचे ठरवले.

गोविंदचा बैल एका चोराने चोरलेला होता. तोही त्या बाजारात तो बैल विकायला आला.

चांगला बैल शोधत गोविंद बाजारात सगळी-कडे हिंडतफिरत, चौकशी करीत होता. एका ठिकाणी त्याला एक चांगला तगडा बैल दिसला. गोविंद त्याच्याजवळ गेला तर काय, तो त्याचाच बैल होता.

बैल विकणाऱ्या माणसाला गोविंदने जरा घुश्श्यांतच फटकारले, "ही तर शुद्ध लबाडी आहे. तू आहेस तरी कोण? हा माझा बैल आहे. गेली चार वर्षे हा माझ्याजवळ आहे. आणि ह्याला घेऊन मी शेती करतो आहे."

गोविंदचे बोलणे ऐकून चोर प्रथम घाबरलेला होता. पण नंतर जरा सावरून तो म्हणाला, "दिवसा ढवळ्या खोटं बोलतोस? हा बैल चार वर्षे तुझ्याकडे कसा असेल? तो माझ्याकडेच पांच वर्षांपासून आहे आणि त्याच्या मदतीने मी शेती करतो. मुलीच्या लग्नाला पैसे उभे करायचे होते, म्हणून मी हा विकतो आहे."

गोविंद बुचकळ्यात पडला. बाजारांत आलेले काही लोक तिथे गोळा झाले आणि काय भांडण चाललय ते विचारू लागले. कारण एकदा समजल्यानंतर त्यातल्या एकाने गोविंदला विचारले, "उगीच का भांडतो आहेस? हा बैल तुझाच आहे, ह्याला पुरावा काय?"

"पुरावा" शब्द ऐकल्यानंतर गोविंदने कमरेला बांधलेला पंचा घेतला आणि त्या बैलाचे दोन्ही डोळे बांधून तो म्हणाला, "तुमचा असा दावा आहे कीं हा बैल तुमचाच आहे. माझा बैल एका डोळ्याने आंधळा आहे. सांगा कोणता डोळा आंधळा आहे?"

ह्या प्रश्न ऐकून चोर बावरला. चूक उत्तर दिले, तर तो चोर ठरेल. त्याच्या पाळीव कुत्र्याचा डावा डोळा आंधळा होता. त्याला ते आठवले आणि त्याने उत्तर दिले, "माझ्या बैलाचा डावा डोळा आंधळा आहे."

त्याचे उत्तर ऐकून गोविंद जोरजोराने हसायला लागला, आणि त्याने बैलाच्या डाव्या डोळ्या-वरचा पंचा बाजूला करीत म्हटले, "अरे, तुम्ही सगळ्यांनी नीट बघा. ह्या बैलाचा डावा डोळा किती चांगला आहे."

पळून जाण्याच्या हेतूने चोर इकडे तिकडे पाहात घाबरलेल्या आवाजाने म्हणाला, "हो, मी चुकून सांगितले. माझ्या बैलाचा डावा नव्हे, उजवा डोळा अधू आहे."

"डावा असो किंवा उजवा, तुझ्या सांगण्याप्रमाणे तुझा बैल एका डोळ्याने आंधळा आहे ना?"

"हो, हो त्यात शंकाच नको. माझा बैल एका डोळ्याने आंधळा आहे हे मी ठामपणाने सांगतो."

गोविंदने बैलाच्या डोळ्यावरचा पंचा काढला व चोराला म्हटले, "अरे भामट्या, माझा बैल आंधळा नाही. बघ, त्याचे दोन्ही डोळे कसे छान चकचकीत आहेत." गोविंद उत्साहाने बोलत होता.

लोकांनी तात्काळच चोराला पकडून बांधले. जेव्हा तो स्वतःला सोडवायचा प्रयत्न करायला लागला, तेव्हा जमीनदाराचे नोकर तिथे आले. त्यांनी चोराचे हात बांधून त्याला ओढतच कचेरीत नेले.

गोविंदला त्याचा बैल मिळाला, त्याशिवाय त्याने चोरालाही शिताफीने पकडून दिले. लोकांनी त्याची खूप तारीफ केली.

विनायक जोशी



ग्रामाधिकारी

रामपूरचा ग्रामाधिकारी प्रसाद एक मोठा शेतकरी होता. त्याच्या वडिलांकडून त्याला दहा एकराचे शेत मिळालेले होते. पण आपल्या हुशारीने आणि [illegible] पैसा [illegible] गरीब होते. जेव्हा त्यांना पैशाची गरज पडत होती, तेव्हा ते प्रसादच्या मदतीवर अवलंबून असत. म्हणून त्या गांवात प्रसादची अरेरावी चालत होती. [illegible]

प्रसादला परिस्थितीनेही साथ दिली. म्हणून त्याचा अहंकार वाढतच गेला. ग्रामाधिकारी असूनही गावकऱ्यांच्या अडीअडचणींविषयी त्याची बेपर्वाई दिसून येत असे. [illegible] मुले शिकून मोठी झाली [illegible] करतील, म्हणून त्याने पडझड झालेल्या शाळेची [illegible]

अशी वेळी सूरज नावाचा एक नवीन तरुण शिक्षक म्हणून त्या गांवात आला. हा कृष्णपुरचा राहणारा होता आणि प्रसादच्या धाकट्या [illegible] होणारा अन्याय व अत्याचार पाहून सूरजने गावकऱ्यांना मदत करायचा [illegible]

सूरज भाचा होता म्हणून [illegible]

[illegible]

सूरजने [illegible] संध्याकाळीस [illegible] दुरुस्ती केली आणि [illegible] शिकवायला सुरुवात केली [illegible] तो लिहायला वाचायला [illegible] त्याशिवाय त्यांना वेगवेगळ्या [illegible]

ते पाहून प्रसाद आतल्या आत संतापला. त्याला [illegible] कसे पळवून लावावे, ह्याचा विचार करताकरता एके दिवशी संध्याकाळी तो शाळेत गेला. त्यावेळी सूरज मुलांना काहीतरी सांगत होता. [illegible]

"[illegible]

[illegible] या सर्व दुर्गुणांपासून दूर राहायला हवं. सारे गांवच [illegible] प्रत्येकजण चांगलाच [illegible] सूरज त्याला असा उपदेश करत होता, [illegible] त्यांना समजावून सांगत होता.

त्याच्या बोलण्यातली सत्यता प्रसादच्या मनात [illegible] प्रसादचे मात्र [illegible] म्हणाला, "सूरज, तू अजून तरुण आहेस, पण तू माझे डोळे उघडलेस. ग्रामाधिकारी होऊन देखील जी कामे मी करवून घेतली नाहीत, ती तू सहा महिन्यांतच करून दाखवलीस. तू या गांवचा ग्रामाधिकारी होण्याच्या योग्यतेचा आहेस."

"तुमच्यात हा बदल केव्हा होईल, याची मी वाट पहात होतो. मामा, आता तुम्ही खरे ग्रामाधिकारी आहात. यापुढे तुम्ही गावकऱ्यांच्या गरजा पूर्ण करा आणि नांव मिळवा. उद्या सकाळीच मला उठून रामपूरला जावे लागेल." सूरजने सांगितले.

- प्रवीणा, आंध्र प्रदेश





धनपिपासू

पालक हा हस्तवर गावात राहात होता. तो धनपिपासू व अत्यंत कंजूष होता. सावकारी करून व व्यापारात त्याने भरपूर पैसा कमावला होता.

एका दिवशी व्याजाची वसुली करायला तो शेजारच्या गावात गेला होता. परत येईपर्यंत अंधार पडला होता. तरीदेखील तो गावी परतायला निघाला. त्यावेळी समोरून येणाऱ्या घोडागाडीच्या चालकाने त्याला ओळखले व म्हटले, "पालकजी, एक रुपया भाड्यामध्ये तुम्हाला गावी सुरक्षित नेतो बघा!"

पालकने चिडून म्हटले, "मी पायी जाऊ शकतो. इतका जोरात चालीन की तुझा घोडादेखील माझी बरोबरी करू शकणार नाही."

"एक रुपया द्यायला तुम्ही इतकी किरकिर करता आहात. तुम्हाला माहीत आहे ना, वाटेत भुतेप्रेतेही आहेत." गाडीवानाने पालकला घाबरवण्यासाठी म्हटले.

परंतु पालकने त्याच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही, आणि तो चालायला लागला. चांदणी रात्र होती, म्हणून रस्ता स्वच्छ दिसत होता. रस्त्यात पारंब्यांनी लादलेला असा एक विशाल वटवृक्ष होता, आणि त्याच्याजवळच एक जुनाट, ओसाड धर्मशाळादेखील होती. धर्मशाळेसमोर एक वृद्ध पुरुष उभा होता, त्याने विचारले, "ठीक आहेस ना, पालक?"

पालकने त्याला नीट न्याहाळून म्हटले, "तुम्हाला मी यापूर्वी कधी पाहिलेले नाही. कोण आहात तुम्ही?"

"मी तुझ्या सात पिढ्यापूर्वीचा पूर्वज आहे. म्हणजे तुझा पणजोबा." म्हातारा म्हणाला.

"माझे पणजोबा तर माझ्या जन्मापूर्वीच मरण पावले होते. तेव्हा त्यांचे पणजोबा अजून जिवंत असू शकतील, यावर माझा काही विश्वास नाही. पण तुम्ही त्या पणजोबांच्या पणजोबांचे भूत तर नाही ना?"

"तू बरोबर ओळखलंस. घाबरू नकोस, पालक. मला तू खूप आवडतोस. म्हणून तर तुला ही सगळी धनराशी द्यायला मी आलो आहे. माझ्या आयुष्यात मी ही संपत्ती लपवून ठेवली होती. या गुप्तधनाबद्दल आणि माझ्याबद्दल मी तुला सांगतो ते ऐक." तो वृद्ध म्हणाला.

त्या भुताचे नाव प्रकाश होते. तो पालकपेक्षाही जास्त श्रीमंत व कंजूष होता. पैसे साठवणे हे त्याचे एकमेव लक्ष्य होते. त्याची मुले किंवा नातवंडे काही त्याच्यासारखी नव्हती. ती कंजूष नव्हती किंवा पैशांमागे पळत नव्हती. हीच चिंता त्याला कायम पोखरत होती. ती सारीजण उदार मनाची होती.

संधी मिळेल तेव्हा दानधर्म करायला पुढे होत असत. सढळपणे पैसे खर्चत असत. जेव्हा प्रकाशने पाहिलं की त्याने साठवलेला पैसा बर्फासारखा वितळून जातो आहे, तेव्हा त्याला फारच वाईट वाटले.

बराच विचार करून त्याने एक कठोर निर्णय घेतला. त्याने सर्वांना घराबाहेर काढलं. मेल्यानंतर भूत होऊन त्या संपत्तीचे तो रक्षण करू लागला. नुकतीच त्याला पालकबद्दल माहिती कळली. त्याला वाटले की एवीतेवी पालक हा त्याचाच वारस आहे. तर ही धनसंपदा त्यालाच देऊन टाकावी. म्हणजे धन सुरक्षित राहीलच, शिवाय त्यात वाढ होईल.

पालकने भुताचे म्हणणे नीट ऐकले आणि त्याला हर्षवायू झाला. भूत त्याला म्हणाले, "वत्स पालक, माझी सारी संपत्ती मी तुला देईन, पण एका अटीवर."



पालकने आतुरतेने विचारले, "सांगा कोणती अट आहे?" "मी अदृश्य राहून तुझ्याबरोबर सतत राहीन. घराची सारी जबाबदारी माझ्यावर तू सोपवली पाहिजेस. मी सांगेन तसंच वागलं पाहिजेस." भुताने म्हटलं.

तेव्हा पालकने मागचा पुढचा काहीही विचार न करता आनंदाने भुताची ही अट मान्य केली. त्यानंतर प्रकाशने आपली सगळी लपवलेली संपत्ती पालकच्या स्वाधीन केली, आणि पालकच्या घरची देखभाल करण्याची जबाबदारी भुताने स्वीकारली. त्याच क्षणी घराचा नरक बनला. घरात पालकची आई, त्याची पत्नी, तीन मुले असे सहाजण राहात होते. त्याच्या अटीनुसार जेवणात तिखटमीठ लागत होते, त्याचा चौथा भाग वाचवायचा होता. केवळ भाजी-आमटी व

रजनी कामत

[illegible]

पार्वतीला ही अचानक आजारी पडली. "पार्वतीला शेजारच्या गावातल्या वैद्याकडे न्यायचे आहे. पेटीमधले थोडे पैसे मी काढून घेऊ का?" पालकने भुताला दबल्या स्वरांत विचारले.

"नाही! आपले वाडवडील सांगत असत की उपवास हे सर्वांत मोठं औषध आहे. तिला उपास करायला सांग म्हणजे ताप पळून जाईल." भुताने कडक शब्दांत नकार दिला.

[illegible]

"असं झालं तर आपल्याला फायद्याचंच आहे [illegible] [illegible]

[illegible] पालक इतका [illegible]

[illegible] काढली. [illegible] तिने पैसे काढले [illegible]

[illegible]

शिल्लक राहिलंय ते आता वाच तरी!

[illegible] प्रकारची भस्मे, चाटण, काढ्याची बाटली त्याला दिसली. तितक्यात त्याची पत्नी तिथे आली. तिला त्याने विचारले, "हे सर्व काय आहे?"

[illegible]

[illegible] राहू आणि आपण सगळेच एकदम आत्महत्या करून टाकू. [illegible]

[illegible] थोडीशी रक्कम त्याने पत्नीला देऊन म्हटले, [illegible]

[illegible]

[illegible] विचारले.

"त्याचा निर्णय देवाच्या हातांत असेल [illegible] आणि त्याचा उपभोग घ्यायचा नाही. अन् ती पेटीत ठेवून त्याची फक्त राखण करायची, याच्याचसाठी का? आपल्या मुलीच्या औषधपाण्यासाठी देखील पैसे खर्चायचे नसतील, [illegible]

[illegible]



गुरु-भार

विश्वेश्वररायपुर एक चांगले मोठे गाव होते. तिथे भगवद्गीतेचा सप्ताह चालू होता. गांवकरी आठवडाभर भक्तिसागरात डुंबत होते. शेवटच्या दिवशी त्रिपाठींने त्यांना सांगितले,

"प्रिय श्रोतेगणहो, परमेश्वराने मला इतकाच वेळ दिलेला आहे. मला आता दुसऱ्या गावी अशाच कार्यक्रमासाठी जायला हवे. मोक्षप्राप्तिसाठी निरंतर प्रयत्न करीत राहिले, तर मानव-जन्माचे सार्थक होते. त्या मार्गदर्शनासाठी एका सद्गुरुची नितांत आवश्यकता असते. असा गुरु देवासारखा असतो. आपणा सर्वांना अशा सद्गुरुचा अनुग्रह मिळावा, अशी माझी मनःपूर्वक इच्छा आहे. आता मी आपल्या सर्वांचा निरोप घेतो."

गावकऱ्यांनी त्रिपाठींचा सत्कार केला. त्यांना अनेक भेटी दिल्या आणि आनंदाने त्यांना निरोप दिला.

मंगल व भवानी त्या गावातले जमीनदार होते. दोघे चांगले मित्र होते. त्यांनी त्रिपाठीजींची प्रवचने अगदी लक्ष देऊन ऐकलेली होती. घरी परतल्यावर भावनेच्या भरात मंगलने भवानीला सांगितलं,

"त्रिपाठीजी महान पंडित आहेत. जीवन परमार्थावर त्यांनी सांगितलेलं विवेचन खरोखरच किती चांगलं होतं, नाही?"

"हो तर, ते साक्षात् सरस्वतीचे पुत्र आहेत" भवानी म्हणाला,

"जेव्हा मी त्यांचं प्रवचन ऐकलं, तेव्हापासून माझं मन अस्वस्थ झालेलं आहे. मला सद्गुरुचा शोध घ्यायचा आहे. आणि त्यांच्या पायावर माझं आयुष्य वाहायची माझी इच्छा आहे. तू काही काळ माझ्या शेतीवाडीची जबाबदारी सांभाळ, माझ्या घराकडे लक्ष ठेव. जर तू कबूल झालास तर मी त्या कामासाठी बाहेर पडणार आहे. सांग, तुझी तयारी आहे? मला यांत मदत करशील?" मंगलने विचारलं.

"तुला मदत करायला माझी तयारी आहे. पण एक गोष्ट नीट लक्षांत घे. गुरु शोधायचा, तो किती चांगला आहे ते पाहाण्यासाठी आपल्याला योग्य ती परिस्थिती व ज्ञान असलेच असं नाही! शिवाय गुरु हवा, तो कशासाठी हवा आहे? खूप विचार करून मग निर्णय घे." भवानीने म्हटलं.

"मी खूप विचार करूनच हे ठरवलं आहे. प्रयागजवळ कुणीतरी श्रेष्ठ महात्मा आहेत म्हणे! ते पाण्यावरून चालतात, हवेत तरंगतात आणि आगीतूनसुद्धा चालू शकतात असं ऐकलंय. मी त्यांच्याकडे जायचं ठरवलंय. त्यांच्या सहवासात माझे आयुष्य नक्की सत्कारणी लागेल" मंगल म्हणाला.

आता मंगलला थांबवलं तरी तो थांबणार नाही हे भवानीच्या लक्षांत आले. म्हणून तो मंगलला आश्वासन देत म्हणाला,

"तू निश्चिंत मनाने जा. तुला लौकरच सद्गुरुचे दर्शन होवो, व तुझा उद्धार होवो अशी माझी मनःपूर्वक प्रार्थना!"

मंगल प्रयागला गेला आणि तिथे नित्यानंद स्वामींच्या आश्रमांत पोंचला. तिथे त्याला लोकांची खूप गर्दी दिसली. ती पाहून मंगल आनंदून गेला. शिष्यांनी त्याची चौकशी केली आणि स्वामीजींकडे ते त्याला घेऊन गेले.

त्यांना पाहून मंगळ अभावितपणे उद्गारला,



"वा, किती तेजस्वी चेहरा आहे. किती समाधान वाटतंय!" आणि त्यानं भक्तिभावाने स्वामीजींच्या पायावर डोकं ठेवलं.

"ऊठ मंगल, तुला मोहपाशांतून सुटका हवी आहे ना, तर तुला काही काळ तपस्या केली पाहिजे. त्यानंतर तुला जे हवे आहे, ते तुला मिळेल. हरि ओम् तत्सत्!" स्वामीजींनी त्याला आशीर्वाद दिला.

"आपण सर्वज्ञ आहात. माझ्याबद्दल आपल्याला सारे काही माहित आहे. या जन्मातून मला मुक्ति हवी आहे." मंगलने विनंती केली.

स्वामीजींनी हसून म्हटले, "सारं काही तुझ्याच हातात आहे. हे बघ मंगल, तुझ्या मनात वैराग्य वाढलं पाहिजे. हा प्रसाद घे आणि श्रद्धा-भक्तीपूर्वक हा खा." असं म्हणून स्वामीजींनी हातांत

जयप्रकाश



ध्यान ... केला. त्याच्या हातात अचानक एक सीताफळ दिसू लागले. ते त्यांनी मंगलला दिले. तो भारावून गेला.

मंगलने घर सोडल्याला आता सहा महिने होऊन गेले होते. त्याचा ठावठिकाणा कुणाला माहित नव्हता. काही लोकांनी म्हटलं, "तो हिमालयात आहे."

तर कुणी म्हटलं, 'तो आता म्हणे वैरागी झालाय!' या गोष्टी ऐकून मंगलची पत्नी व मुलं हैराण झाली. पण त्यांचा नाईलाज होता. भवानीचा मात्र त्यांना चांगला आधार होता. प्रत्येक वेळी अडीअडचणींला तो त्यांना धीर देऊन मदत करीत होता.

एक दिवस मंगलकडून दोन पत्रे आली. एक त्याच्या पत्नीला व दुसरे भवानीला. त्याने त्या पत्रात लिहिले होते, 'मी श्री नित्यानंद आश्रमात राहतो आहे. परमपूज्य गुरुजींनी मला उपदेश केला आहे की मी बंधने तोडून तुम्हा सर्वांपासून दूर राहावे. इथे शांतपणे मी राहणार आहे.

माझी पत्नी व मुलांना कोणतेही कष्ट होऊ नयेत, कसलीही उणीव भासू नये, म्हणून त्यांच्यासाठी तीन एकराचे शेत व घर मी त्यांना देतो आहे.

जी शेतजमीन उरली आहे, ती व मळा मी विकणार आहे आणि या आश्रमात येऊन राहणार आहे. जर योग्य किंमत आली तर मी येईन आणि जमीन विकून परत इथे येईन.

पण गुरुजींनी सांगितलं तरच माझा हा निर्णय बदलू शकेल.'

पत्र वाचून मंगलची पत्नी व मुले भेदरली व लगेच भवानीच्या घरी गेली. त्याने त्यांची समजूत घालीत म्हटले, ' मी सांगतोय तसे करा. तुमची काळजी दूर होईल.' त्या सर्वांनी होकार दिला. नंतर ती दोन्ही पत्रे घेऊन भवानी ग्रामाधिकाऱ्याजवळ गेला. त्यापूर्वी मंगलबद्दलची माहिती त्याने ग्रामाधिकाऱ्याला सांगितली होती. ती दोन्ही पत्रे वाचून दोघांनी त्यावर चर्चा केली.

महिन्याभरातच मंगल अचानक गावात आला. तो सरळ ग्रामाधिकाऱ्याकडे जाऊन म्हणाला,

"अहो, केवढा घोर अन्याय! असा द्रोही मित्र मी कधी पाहिला नव्हता. त्याच्यावर विश्वास ठेवून मी माझी संपत्ती, माझा परिवार, त्याच्या स्वाधीन केला होता. आणि भवानीने माझ्याशी अशी लबाडी केली.

माझी घर जमीन स्वतःच्या नावाने केली आणि माझी बायकोमुलें रस्त्यावर आली आहेत. त्यांना न्याय द्या. मला आणि माझ्या कुटुंबाला तुम्ही वाचवा. भवानीला शिक्षा करा हो!"

ग्रामाधिकाऱ्याने मंगलकडे रोखून पाहिले व म्हटले, "तुझ्यावर कसला अन्याय झाला आहे? भवानीवर तुझा कोणता आरोप आहे?"

"मी त्याने केलेल्या लबाडीबद्दल सांगितलं आहे. गुरुच्या शोधार्थ जाण्यापूर्वी मी भवानीला म्हटलं होतं की माझ्या कुटुंबाची नि शेतजमिनीची देखरेख कर. पण त्याने माझ्या मालकीची सारी संपत्ती स्वतःच्या नावावर केली. यापेक्षा जास्त मोठा अन्याय कोणता असेल?" मंगलने त्वेषाने म्हटलं.

"ते ठीक आहे. त्यावर आवश्यक ती कारवाई मी करीन. परंतु हे सांगा की तुमच्या गुरुने काय उपदेश केला होता?" ग्रामाधिकारी शांतपणे विचारत होता.

"भवबंधने पूर्णपणे तोडून आलास तर तुला मी मोक्षाचा मार्ग दाखवीन." मंगलने सांगितलं.

"भवबंधने म्हणजे कोणती असतात हो?" ग्रामाधिकाऱ्याने प्रश्न केला.

"भवबंधनचा अर्थ आहे. पत्नी, मुलं, आप्त मित्र वगैरे सर्वांना विसरून जाणे, त्यांचा त्याग करून निघून जाणे!" मंगल म्हणाला.

"तुम्ही पत्रात लिहिलं होतं की तुमच्या मनात



... भवबंधन तोडून ... आहे, वगैरे ... पुन्हा ... हे माझं ... बंधन' हे सगळं पुन्हा कसं उपटलं? आणि आता तुमच्यापाशी राहिलय तरी काय? तेव्हा तुम्ही आपल्या गुरुकडे परत जा आणि परमेश्वराच्या सेवेत रुजू व्हा ना. तुम्हाला मोक्षही नक्की मिळेल." ग्रामाधिकारी उपहासाने म्हणाला.

"माझे गुरुजी नेहमी मला सांगत असतात की कोणतेही काम पूर्ण झाल्याशिवाय परत येऊ नको. जोपर्यंत माझी मालमत्ता मला परत मिळत नाही, तोपर्यंत मी इथून हलणार नाही." मंगल ठामपणे म्हणाला.

त्यावर ग्रामाधिकारी मोठ्याने हसायला लागला व मग मंगलला म्हणाला, "भवानीजवळ जी कागदपत्रे आहेत, त्यावरून ती सारी संपत्ती

त्याच्या नावावर आहे. थांबा, मी त्यांना इथे बोलावून घेतो."

"त्यानेच ते खोटे कागद बनवलेले असतील," मंगल संतापाने म्हणाला.

[illegible]

[illegible] मग [illegible] पुन्हा कशासाठी [illegible] आहात?" गंभीर स्वरात ग्रामाधिकारी म्हणाला.

[illegible] म्हणून [illegible] ग्रामाधिकाऱ्याला म्हणाला.

तुम्हाला काय हवं आहे? [illegible] की [illegible] तुमचा [illegible] की [illegible] तुमच्या मधे [illegible] [illegible]

[illegible] मंगलच्या लक्षांत आलं. त्याने हात जोडून म्हटलं, "माझ्या हातून किती मोठी चूक झाली आहे ते आता मला लक्षात आलं. मला क्षमा करा. माझे डोळे आज उघडले!" मंगलने ग्रामाधिकाऱ्याचे पाय धरले.

ग्रामाधिकाऱ्याने मंगलला प्रेमाने [illegible] आणि त्याला म्हटलं,

"तुम्हाला आपली चूक समजली ही आनंदाची [illegible] आहे. तुमच्या मनात हे परिवर्तन व्हावं म्हणून [illegible] तुमच्या कुटुं[illegible] नुकसान झालेलं नाही. [illegible] ग्रामाधिकाऱ्याने [illegible] [illegible]

मंगलला [illegible] [illegible] असतो."

मंगलने [illegible] मान खाली घातली.

चन्दामामा प्रश्नावली - ६

बरोबर उत्तर देणाऱ्यांपैकी एकाला रु. २५०/- दिले जातील

या प्रश्नावलीत विचारलेले सर्व प्रश्न २००५ मध्ये जानेवारी ते डिसेंबर या अंकात आलेल्या माहितीवर आधारित आहेत. तुम्ही त्या वाचलेल्या असतील. जर तुम्हाला त्या आठवत असतील तर तुम्ही लगेच उत्तरं देऊ शकाल. लक्षात नसतील तर ते अंक पुन्हा नजरेखालून घाला. म्हणजे उत्तर शोधताना मजा वाटेल.

[illegible] उत्तर देणाऱ्यांपैकी [illegible] विजेत्याचे नाव [illegible] काढून दिले जाईल.

त्यासाठी [illegible] चांदामामा प्रश्नावली ६ असं लिहा. [illegible] चांदामामाचा संपूर्ण [illegible] लिहून आम्हाला [illegible] ६ जुलै [illegible]

[illegible] विश्वासाने व दृढ निश्चयाने [illegible] आवश्यक [illegible] आणि [illegible] कोण [illegible] आणि कोणत्या [illegible]?

- [illegible] केंद्र आपल्या देशात कुठे आहे?
2. [illegible] त्याचं वय किती होतं?
3. [illegible] कोणती आहे?
4. [illegible]
6. [illegible] जन्म कुठे झाला?
   [illegible] कोण होते?

[illegible] आहे?

अमृतसिद्धी

[illegible] ऐसे राज्य कधीच असत [illegible] चिरायू याच्या पदरी नागार्जुन नामे बोधिसत्व प्रधान म्हणून काम करीत होते.

प्रधान नागार्जुन दयाळू, दानशील व रसायन-शास्त्रात, औषध तयार करण्यात निपुण म्हणून प्रसिद्ध होता. त्याने रसायन-शास्त्रांत प्रयोग करून एक गूढ औषध व रसायन तयार केले व ते खाऊन त्याने स्वतःला व आपल्या राजाला [illegible] मुक्त करून घेतले [illegible]

त्याने या औषधाचा व रसायनाचा शोध लावला, त्याच्या मुळाशी त्याच्या [illegible] मृत्यू होता. एकदा त्याच्या मुलांपैकी त्याचा सर्वात जास्त लाडका सोमदेव नावाचा मुलगा मरण पावला. नागार्जुनाला अर्थातच त्याचे फार दु:ख झाले. दयाळू नागार्जुनाने विचार केला की जगात कोणाला मरणच येऊ नये व मरणामुळे कोणाला शोक करण्याचे कारणच राहू नये.

[illegible] त्याला [illegible] खर्च होणार. म्हणून [illegible] सुद्धा सेवेल अशी औषधी वनस्पती व [illegible] अमृत तयार केले पाहिजे." [illegible] असा विचार होता.

त्याप्रमाणे तो औषधी वनस्पतींचा शोध काढू लागला. त्याला जेवढे आयुर्वेद शास्त्राचे ज्ञान होते, त्याचा पूर्ण उपयोग करून त्याने अनेक प्रयोग सुरू केले. अनेक क्रिया प्रक्रिया करून [illegible] अमृतसत्व नावाची एक [illegible] प्रयोग पूर्ण होणार होता.

ही गोष्ट इंद्राला कळली. त्याने लगेच अश्विनी कुमारांना बोलाविले आणि त्यांना [illegible] "तुम्ही लगेच भूलोकात जायला निघा. [illegible] नागार्जुनाने जो 'अमृत योग' सिद्ध करण्याचा प्रयोग सुरू केला आहे, त्यांत विघ्न आणा."

[illegible] भूलोकी [illegible]

नागार्जुनाला भेटून कुशल प्रश्न विचारू लागले [illegible] म्हणाले – "मंत्रीवर! राज्ये कशी [illegible] आपण [illegible] व चतुर आहात [illegible] माहीत नाही, असे या जगात काय [illegible] ब्रह्मदेवाचा संकल्पच उलटून टाकण्याच्या प्रयत्नात आपण व्यस्त दिसता [illegible] कथा? ब्रह्मदेवाने कपाळावर लिहून [illegible] नाही तेच उलटून टाकण्याच्या प्रयत्नात [illegible] आपण [illegible] पालन करणे देवांना अशक्य होईल. आपल्याला [illegible]

परंतु त्या सर्व उपदेशाच्या नागार्जुनाच्या [illegible] सामंतराजाचा मुलगा जयसेन याच्या राज्याभिषेकाची जय्यत तयारी चालू होती [illegible] इंद्र [illegible] भेटून [illegible]

[illegible] भयातून मुक्त झाले आहेत हे तुला माहीत नाही वाटतं? म्हणजे तुला आयुष्यभर युवराज व्हावे लागणार. सिंहासनारूढ होण्याचे भाग्य लाभणार नाही."

हे ऐकून जयसेन विचारात पडला. तेव्हा तो वृद्ध ब्राह्मण त्याला म्हणाला, "बाबा रे, यासाठी एवढं दु:खी होऊन हातपाय गाळून बसण्यात काय अर्थ आहे? तुझी इच्छा पूर्ण होण्यास सोपा उपाय आहे. दररोज नागार्जुन जेवणापूर्वी कोणी काही मागितले तर ते तत्काळ देतात. उद्या तू त्याच्या जेवणापूर्वी जा आणि मागपुढे न पाहता म्हण "मला तुमचे मुंडके हवे आहे!" इंद्राने जयसेनच्या मनात चांगले विष ओतले.

राज्याकांक्षा असल्यामुळे जयसेन दुसऱ्याच दिवशी नागार्जुनाच्या जेवणाच्या वेळी गेला

आणि वृद्ध ब्राह्मणाने सांगितले होते तसेच म्हणाला. नागार्जुनाने कोणताही संशय न दर्शविता आपली तलवार उपसून जयसेनाच्या हातात दिली व म्हणाला – "बाबारे! माझे मुंडके कापून घे!" जयसेनाने अनेक वेळा तलवारीने वार केले परंतु तलवार 'खणकन' वाजे, परंतु डोके काही कापले जात नव्हते. कारण 'अमृतसिद्धी' रसायनाच्या प्रभावाने त्याचा देह वज्रदेह झाला होता.

ही गोष्ट चिरायू राजाच्या कानावर जाता म्हणता गेली. तो धावतच तेथे आला. मुलगा करत होता ते बरोबर नाही, असे त्याला समजावून सांगू लागला.

तेव्हा नागार्जुन राजाला म्हणाला – "महाराज हे युवराज का मारीत आहेत याची पूर्वापर कथा मला माहीत आहे. ते निमित्तमात्र आहेत. म्हणून त्याला अडवू नये. आतापर्यंत मी पूर्वजन्मी 'नको' न म्हणता नव्याण्णव वेळा आपले डोके कापू दिले आहे. आता शंभरावी वेळ आली आहे. मी हा जो वेष धारण केला आहे त्याला अपकीर्ती येता कामा नये. यासाठी मी वचन दिल्याप्रमाणे ते पूर्ण करण्याची जबाबदारी माझ्यावर आहे." असे सांगून नागार्जुन राजाला अगदी शेवटचा म्हणून कडकडून भेटला.

त्यानंतर त्याच्या जवळच्या भुकटीतली एक मुठी काढून ती तलवारीवर घासून तलवार जयसेनाला देत म्हणाला – "बाबा रे, आता वार कर!"

जयसेनाने यावेळी वार करताच नागार्जुनाचे डोके देठ कापताच जसे कमळ जमिनीवर पडते तसे पडले.

ते दृश्य पाहू न शकल्यामुळे राजा स्वतः आत्महत्या करायला तयार झाला.

त्या वेळी नागार्जुनाचे खाली पडलेले डोके बोलू लागले – "चिंतामग्न होऊ नकोस. तू कितीही जन्म घेतलेस तरी मी नित्य तुझ्याबरोबरच राहीन." असे म्हणत त्याने प्राणत्याग केला. राजाला जिवाचा वीट आला. त्याने तत्क्षण मुलाचा राज्याभिषेक करून दिला व तपश्चर्या करण्यासाठी वानप्रस्थाश्रमात प्रवेश केला.

अशा प्रकारे जयसेनाला राज्यलाभ झाला. देवेंद्राची इच्छा पूर्ण झाली.





रामायण

"रामाला वनवास देऊन भरताचा राज्याभिषेक कसा करायचा हे मी सांगते. राणीसाहेबांना आठवत नाही का, एकदा देव व राक्षस यांचे युद्ध चालू असता महाराज इंद्राला मदत करण्यासाठी गेले होते. त्यांच्या बरोबर राणी सरकारपण गेल्या होत्या. दंडकारण्यात मत्स्यध्वज याच्या राज्यात वैजयंतजवळ शंबर नांवाच्या राक्षसाशी युद्ध करीत असतां महाराज जखमी होऊन बेशुद्ध झाले होते. तेव्हा राणीसरकारांनी रथ युद्धभूमीपासून दूर नेऊन महाराजांचे रक्षण केले होते. शुद्धीवर आल्यावर महाराजांनी राणीसाहेबांना दोन वर देऊ केले होते. ते वर मागण्याची वेळ आता आली आहे. एका वराने रामाला चौदा वर्षे वनवास व दुसऱ्या वराने भरताला राज्य मागून घ्यावे." मंथरेने कैकेयीला सुचविले.

वस्तुतः कैकेयीचा स्वभाव दुष्ट नव्हता. परंतु मंथरेच्या संगतीत तिचे मन पालटले होते.

ती मंथरेला म्हणाली – "कुबडी तू कुबडी असलीस तरी तुझे डोके मात्र खूप चालते बाई! तुझ्या इतकी माझी हित इच्छिणारी दुसरी कोणी असेल असे नाही वाटत."

नंतर तिने मंथरेच्या सल्ल्याप्रमाणे अंगावरचे सर्व दागिने काढून जमिनीवर फेकून दिले व एक फाटके जुने लुगडे नेसून ती कोपगृहात जमिनीवर जाऊन झोपली.

मंथरेने तिला बजावून सांगितले – "महाराज येतील तेव्हा त्यांच्याशी बोलू नका. रडत रहा. फक्त रामाची शपथ घेऊन विचारीपर्यंत कांही बोलू नका. कारण रामाची शपथ घेतल्यावर ती मोडणे शक्य नाही.



'त्या शंभर [illegible] तूच जास्त वस्ताद दिसतेस की ग! ' असे प्रेमाने सांगत तिने मनाशी निश्चय केला की राजाने वचन दिल्याप्रमाणे वर दिले नाहीत तर त्याच्या समोरच डोके फोडून प्राण द्यायचा.

महाराज दशरथ रामराज्याभिषेकाची सर्व तयारी करण्यासाठी आज्ञा देऊन कैकयीला स्वतः शुभवार्ता देण्यासाठी तिच्या महालाकडे निघाले. पण ती तेथे नव्हती. चौकशी करता ती कोपगृहात गेल्याचे कळले. तेव्हा राजा मनातल्या मनात चपापला.

परंतु तिच्या रुसण्याफुगण्याचा राजाला चांगला अनुभव होता, म्हणून 'ती काय मागेल ते देऊ' असा विचार करीत राजा कोपगृहाकडे निघाला.

नंतर [illegible] राजाच्या हृदयाला चरकाच बसला. आजच्यासारख्या शुभप्रसंगी तिने असा अशुभ वेष का धारण करावा? ती जमिनीवर लोळत पडली होती. मोत्याचा हार तुटलेला होता, आणि आकाशात तारे असतात तसे जमिनीवर मोती विखुरलेले होते.

दशरथाने जवळ जाऊन प्रेमाने विचारले - "एवढा [illegible] राग हा? कोणी तुला रागावले की तुझा अपमान केला? तुला बरे नाही का? राजवैद्याला बोलावू का? तू मागशील त्याचे डोके उडवतो. ऐकू तरी दे की तुझा अपमान करण्यासाठी येणारा असा हा कोण आहे? सांग कोणाला राजाचा रंक करू! ऐकू तरी दे, तुझ्या मनात काय आहे ते. आज तुझ्या लाडक्या रामाचा राज्याभिषेक आहे. अशा शुभप्रसंगी तुला असे रुसणे शोभते का?'

पण कैकेयीने तोंड उघडले नाही. राजाने प्रेमाने तिची वेणी हातात घेऊन विचारले - "लाडके! काय हवे तुला? घे मागून. रामाची शपथ, तू मागशील ते मी देईन."

तेव्हा तिने विचारले - "माझे दोन वर दिले होते ते आठवते का?"

राजा म्हणाला - "अग दोनच काय? दोनाच्या जागी चार मागून घे! मुद्दल व्याजासकट वसूल करून घे. पण अशी रुसून नको बसू." बिचाऱ्या [illegible] होता?

राजाने [illegible] दोन्ही वर मागितले. म्हणाली -

"पहिल्या वराने रामाच्या ऐवजी भरताला राज्य व दुसऱ्या वराने रामाला चौदा वर्षे वनवास द्यावा."

ते ऐकून राजाला डोक्यावर एकदम वीज पडल्यासारखे वाटले व तो त्या धक्क्याने बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. थोड्या वेळाने शुद्ध [illegible]

"तू एक राजकन्या आहेस असे समजून मी तुझ्याशी लग्न केले. पण तू एक नागीण आहेस हे मला आज कळले. तुझे त्याच्यावर स्वतःच्या मुलापेक्षा जास्त प्रेम होते, आणि आज तुला हे काय झाले? तुझ्या मनेवर भूत तर नाचीना बसले? नाही तर तू असे बोलली नसतीस. मी काय पाप केले किंवा त्याने तरी काय केले? आज विनाकारण त्याला ही वनवासाची शिक्षा का? राम समोर नसेल तर मी एक क्षणभरदेखील जगू शकणार नाही. तू हा हट्ट सोड. भरताला तू राज्य मागून घेतलेस, त्याला मी नाही म्हणत नाही. पण निरपराध रामाला वनवास का, हे नाही कळले मला.

मी तुझ्या पाया पडतो. पदर पसरून प्राणाची भिक्षा मागतो. मीच जगांत राहिलो नाही तर तुला तरी काय सुख मिळणार?

मी जिवंतपणी भरताचा राज्याभिषेक [illegible] राम आहे की नाही, ह्याची परीक्षा पाहण्यासाठी तू हा



वर मागितला असलास, तर मी गैर म्हणत नाही. पण रामाला वनवास [illegible] सांगून तू लोकमर्यादा पाळली नाहीस. या जगात मी चार दिवसांचा पाहुणा आहे. काय वाटेल तो दुसरा वर मागून घे.

पण दशरथाच्या विनवण्याचा उलटाच परिणाम कैकेयीच्या हृदयांत होत होता. ती म्हणाली,

' पहिल्याने वचन देऊन, रामाची शपथ घेऊन वर मागायला सांगितला आणि मी मागितला. वचनभंग करून क्षत्रिय कुळाला कशाला कलंक लावता? मी तो वर परत मागून घ्यायला तयार नाही व राम वनवासाला गेला नाही तर [illegible] देईन, हे विसरू नका. '



दशरथाच्या दु:खी हृदयावर डागण्या देण्यासाठींच जणूं कांही ती ते सर्व म्हणाली. "राज्य द्यायचे वचन देऊन, राज्याभिषेकाची तयारी करायला सांगून कोणत्या तोंडाने रामाला वनांत जायला सांगूं?"

या दु:खाने दशरथाचा धीर सुटत चालला होता. "कैकेयीच्या सांगण्यावरून रामाचा राज्याभिषेक केला नाहीं तर प्रजा व मांडलिक राजे माझ्या नांवावर थुंकतील, त्यांच्या सल्ल्यानेच मी रामाला राज्य द्यायचे ठरविले. कौसल्येला तरी मी कसे तोंड दाखवूं?"

राजाने कैकेयीला समजावून सांगण्यासाठी साम दाम वगैरे सर्व उपाय करून पाहिले. पण तेथे त्याची डाळ शिजली नाही. ती रात्र त्याला प्रलय रात्रीसारखी वाटली.

वशिष्ठ मुनी आपल्या शिष्यांसह राज्याभिषेकाचे साहित्य घेऊन आले. अंत: पुराच्या दाराजवळ सुमंत्र उभा असलेला पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. राज्याभिषेकाची सर्व तयारी झाली असल्याचे राजाला कळवायला त्याला त्यांनी सांगितले. तो आंत गेला व वशिष्ठ मुनींचा निरोप सांगून 'काय आज्ञा आहे?' असे विचारून हात जोडून उभा राहिला.

सुमंत्र राजाचा बालसखा असल्यामुळे त्याला अंत:पुरांत देखील प्रवेश मिळत होता. त्याने प्रसंग ओळखला. राजाला शोकातुर पाहून त्याला भीतीच वाटली. राणीने कांही तरी कारस्थान केले असावे हे ओळखायला त्याला वेळ लागला नाही. पण जणूं कांही घडलेच नाही असे दाखवीत त्याने नेहमीप्रमाणेच राजाला हाक मारली, म्हणाला– "महाराज! सूर्योदयाची वेळ झाली. उठावे! आज रामाचा राज्याभिषेक आहे ना? सर्व आपली वाट पहात आहेत."

दशरथाने एकदां डोळे उघडून पाहिले. रात्रभर रडत राहल्यामुळे त्याचे डोळे लाल झाले होते. तो सुमंत्राकडे पाहून म्हणाला– "सुमंत्रा! सोड मला! कशाला त्या गोष्टी बोलून मला दुखवितोस?"

राजाचे ते शब्द कानीं पडल्यावर सुमंत्राचे मन जास्तच चरकले. तो दोन पावले वचकून मागे सरकला.

दशरथ कांहींच बोलला नाही. तेव्हां कैकेयी म्हणाली– "सुमंत्रा! राजाला रात्रभर झोंप लागलेली नाही. रात्रभर रामाच्या नांवाचा जप चालला आहे. कारण देव जाणे! तूं जाऊन रामाला लवकर बोलावून घेऊन ये."

सुमंत्र निघाला, पण मनांत उलगडा होईना. राजधानींत राज्याभिषेकाची तयारी होती. राजवाड्यांत लोकांची ये जा सुरू झाली. मांडलिक राजे नजराणे घेऊन हजर झाले. पण दशरथ महाराज त्यांना कोठे दिसले नाहीत. समोर सुमंत्र दिसला. त्यांच्या प्रश्नाची वाट न पाहतां तो म्हणाला– "तुम्ही आल्याची गोष्ट मी महाराजांच्या कानावर घालतो. त्यांनी रामाला बोलावून घेऊन यायला सांगितले आहे. म्हणून मी घाईनें तिकडे जात आहे." सर्व लोक ते ऐकून चकित झाले.

कैकेयीने सांगितले ते खरे की खोटे, याची शंका आली म्हणून कीं काय कोण जाणे, सुमंत्र पुन्हां अंत: पुरांत गेला, व म्हणाला, "महाराजा सूर्योदय झाला आहे. आपले सर्व मांडलिक राजे, आपले सेनापति व स्वत: गुरु वशिष्ठ बाहेर वाट पहात आहेत. उठावे, व पुढे काय करावयाचे, ह्याची आज्ञा व्हावी."

"रामाला घेऊन यायला कैकेयीने तुला सांगितले होते ना? मग त्याला घेऊन कां नाही आलास? तिची आज्ञा म्हणजे माझी आज्ञा नाही असे वाटले का तुला? मी जागा आहे, डोळे कान उघडून सर्व ऐकतो आहे. जा, रामाला लवकर बोलावून घेऊन ये!" दशरथाचे ते विचित्र बोलणे ऐकून सुमंत्र जास्तच बुचकळ्यांत पडला.



तो कांही बोलल्याशिवाय चालत होता. रस्त्यावर लोकांची गर्दी होती. कोणाशी कांही न बोलता तो रामाच्या महालाकडे गेला. त्या विशिष्ट परिस्थितीत सुमंत्राला रामाकडे जात असलेला पाहून सर्वांना आश्चर्यच वाटले.

रामाच्या वाड्यासमोर चतुरंग सेना उभी होती. वाजत गाजत त्याची मिरवणूक निघणार होती. मोठ्या थाटाने व समारंभाने त्याचा राज्याभिषेक होणार होता. सुमंत्र त्या सर्वांना बाजूला सरायला सांगून सरळ पुढे गेला. आपण आल्याची सूचना दासीकरवी आंत पाठवून अनुज्ञा होताच तो आंत गेला.

राम सर्व वस्त्रालंकार घालून राज्याभिषेकाला तयार बसला होता. सीता शेजारी उभी होती. सुमंत्राने जवळ जाऊन आदरपूर्वक अभिवादन केले व म्हणाला, "महाराज धाकट्या राणी-साहेबांच्या महालांत आहेत. त्यांनी आपल्याकडे मला बोलावून आणण्यासाठी पाठविले आहे."

ते ऐकून रामाला आनंद झाला. लगेच उठून तो रथांत बसून राजाच्या दर्शनास निघाला. लक्ष्मण त्याच्या पाठीमागे येऊन उभा राहिला. एका हातात छत्र घेऊन, दुसऱ्या हाताने चवर हलवू लागला. रामाच्या रथामागून पायदळ, घोडेस्वार हत्ती व रथ यांचे चतुरंग सैन्य चालू लागले. सर्वांना वाटले कीं, राज्याभिषेकासाठींच राम चालला असावा. पण बरोबर सीता नव्हती, म्हणून शंका कुशंकापण करूं लागले.

रामाचा रथ कैकेयीच्या महालासमोर येऊन थांबला. मागून येणारे चतुरंग सैन्य देखील अर्थातच तेथेच थांबले. राम रथांतून उतरला व पायींच दोन प्राकार पार करून कैकेयीच्या महालांत गेला.

एक सुंदर मंचकावर दशरथ व कैकेयी बसले होते. रामानें दोघांना नमस्कार केला. राजाच्या तोंडून "रामा...." एवढाच शब्द निघाला व दुःखामुळें हुंदका आल्याने पुढे एकही शब्द तोंडावाटे बाहेर आला नाही. राजा डोळे मिटून बसून होता. दोन्ही डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. तो कांही बोलूंच शकला नाही. तोंड फिरवून बसून राहिला. *(क्रमशः)*





हिऱ्याची दुर्बीण

एका शहरांत श्रीगुप्त नांवाचा एक व्यापारी होता. एकदा श्रीगुप्तच्या नातेवाईकांच्या घरी लग्न होते. ते दुसऱ्या गावी होते, म्हणून श्रीगुप्त त्या गावाला चालत जायला निघाला.

रस्त्यात रंगनाथ नांवाच्या एका माणसाशी त्याची गांठ पडली. रंगनाथ शहराजवळच्याच एका गांवात राहात होता. तो आपल्या शेतांत भाजीपाला लावत असे. रोज शहरांत तो नेऊन, विकून, संध्याकाळी आपल्या गांवी परत येत असें. श्रीगुप्तला रंगनाथ माहीत नव्हता, पण रंगनाथ त्याला ओळखत होता.

ते दोघ ज्या रस्त्याने गांवाकडे चालले होते, त्या रस्त्याच्या बाजूलाच एक भुतांचा महाल होता. एके काळी तो महाल एका जमीनदाराचा होता. पण एकदा त्याच्या नातेवाईकांनी गुंडांच्या मदतीने महालावर हल्ला करून जमीनदाराच्या कुटुंबाची हत्या करून घर लुटायचा प्रयत्न केला. त्यावेळी जमीनदाराच्या घरातले कांही लोक पळून गेले, पण महाल मात्र पूर्णपणें लुटला गेला. हळू हळू तो महाल ओसाड पडला. आणि मग अशी अफवा पसरली की, तिथे भुतें रहातात. तो रस्त्यापासून थोडा आंतल्या बाजूला असल्याने, तिकडे जाण्याचेही कोणी धाडस करत नसे.

त्या महालाजवळ पोचल्यावर रंगनाथ श्रीगुप्तला म्हणाला, "अहो, रोज मला इच्छा होते की एकदा हा महाल बघावा. पण मी कधी एकटा जात नाही. कोणी बघितलं तर काय म्हणतील? आज आपण दोघे आहोत, तर आपण महाल बघायचा का?"

श्रीगुप्त हसत त्याला म्हणाला, "भुतांच्या भीतीमुळे आजपर्यन्त गेला नाहीत असं का नाही म्हणत?"

"मला भुतांची भीती वाटतच नाही. आणि भुताखेतावर माझा विश्वासही नाही. चला, आंत

२५ वर्षांपूर्वी चांदोबात प्रसिद्ध झालेली गोष्ट



जाऊन बघू या." रंगनाथ म्हणाला.

दोघेजण त्या उजाड महालाच्या आंत गेले. आंत सगळीकडे वटवाघळे होती. पावसापाण्याने कांही भिंती पडल्या होत्या. अनेक ठिकाणी कोळ्यांची जाळी होती. या सगळ्यामुळे तो महाल भयाण दिसत होता. तरीपण दोघे हिम्मत करुन आंत गेले.

नेमके त्याच वेळी महालाचे मुख्य दार तुटून खाली पडले. भीतीने कापत श्रीगुप्त म्हणाला, "बापरे, ही भुतें आपल्या दोघांना प्राणासकट इथेच गाडतील. तुझ्यासाठी मी इथे आलो, आणि आता तर माझ्या जिवावरच बेतलंय."

रंगनाथ हसून म्हणाला, "महाशय हे कांही भुतांचे काम नाही. काल रात्री पाऊस पडला, त्यामुळे भिंती भिजून ढासळल्या. देवाचे उपकारच आहेत, की त्या आपल्यावर नाही पडल्या! आपल्याला कांही धोका नाही."

"ठीक आहे. आता आपण बाहेर पडायचा कांही तरी मार्ग शोधायला हवा" श्रीगुप्त म्हणाला.

रंगनाथ मोठ्या कौशल्याने तुटक्या भिंतींवर चढून बाहेर आला. त्याच्या मागोमाग श्रीगुप्त पण बाहेर आला.

एके ठिकाणी रंगनाथला पडक्या भिंतीत एक छोटासा तांब्या मिळाला. त्याच्या तोंडावर तांब्याचे झाकण होते. रंगनाथ झाकण उघडून, तांब्या उलटून पालथा केला. त्यांतून कांही खडे खाली पडले. श्रीगुप्तने ते हातात घेऊन पारखून ओळखलं, की हे किमती खडे आहेत. त्याला मोह झाला की रंगनाथला फसवून हे सगळे आपणच पळवावेत.

"हे बघ, सिंहद्वाराजवळ तीन किंवा पांच दगड आपण पुरुन, तिथे हा ठेवूया. असं केलं तर घराला चांगलं असतं असं म्हणतात. नीट बघ. कदाचित् अजून कांही वस्तू सांपडतील." श्रीगुप्त म्हणाला.

रंगनाथ परत तुटक्या भिंतीवर चढला. थोड्या वेळाने रिकाम्या हाताने परत आला. तेवढ्यांत श्रीगुप्ताने तांब्यातले खडे काढून त्या जागी दुसरे साधे खडे घालून ठेवले. रंगनाथ आल्याआल्या ते दगड आजूबाजूला फेकत तो म्हणाला, "ही तर पंचलिंगे आहेत. दगडाची फालतू लिंगे कोणाला हवी आहेत?" आणि त्याने रंगनाथच्या हातात तांब्या दिला.

श्रीगुप्तने जे खडे फेकले होते, त्यांतला एक रंगनाथच्या पायाजवळ पडला. पण त्याच्या जवळच आणखी एक खडा दिसला, पण तो तांब्यातला नव्हता.

"एक फालतू लिंग मी आजची आठवण म्हणून माझ्या बरोबर घेतो." असं म्हणत रंगनाथने तो खडा हातात घेतला.

रंगनाथला कळलं की श्रीगुप्तने तांब्यामधले खडे चोरायला आपल्याला परत पडक्या भिंतीवर चढवलं. पण तसे त्याने दाखवले नाही.


त्या नंतर दोघेही आपापल्या वाटेने निघून गेले. दुसऱ्या दिवशी रंगनाथ आपली भार्जी विकून श्रीगुप्तच्या घरी गेला. रंगनाथला बघून श्रीगुप्त घाबरला. त्यामुळे रंगनाथचा संशय जास्त वाढला.

शहरात रंगनाथचा एक मित्र होता, तो नाटकांत कामें करीत असे. एकेकाळी ते लोक श्रीमंत होते. त्याचे नांव वसंतराज होते. रंगनाथने सगळी हकिकत आपल्या मित्राला सांगितली. आणि श्रीगुप्तला चांगला धडा शिकवायला पाहिजे असं म्हणाला. वसंतराजने एक युक्ती शोधली.

त्याच दिवशी संध्याकाळी वसंतराज भरजरी पोषाख घालून व्यापारी बनून श्रीगुप्तच्या दुकानावर गेला.

श्रीगुप्त त्यावेळी पडक्या महालांत मिळालेल्या दगडांना पैलू पाडत होता. ते पैलू न पाडलेले हिरे होते. खूप दिवस मातीत गाडले गेल्याने साध्या दगडांसारखे दिसत होते.

वसंतराज श्रीगुप्तला म्हणाला, "हे दगड हिरे आहेत ना? अरबी देशात आपल्या हिऱ्यांना खूप



मागणी आहे. मी अरब देशांत हिरे विकून लाखो रुपये मिळवले आहेत."

"हिऱ्यांची किम्मत कशी ठरवली जाते?" श्रीगुप्तने वसंतराजला विचारलं.

"त्यासाठी हिऱ्याची दुर्बीण नांवाचे एक उपकरण आहे. हिऱ्यांना पाणी भरलेल्या भांड्यात एक दिवसभर बुडवून ठेवायचे. तुम्हाला हवे असेल तर एक दिवस ते उपकरण मी तुम्हाला देऊ शकतो." वसंतराज म्हणाला.

यामुळे श्रीगुप्तचा वसंतराजवर विश्वास बसला. त्याने आपले हिरे वसंतराजला दाखवून विचारले," तुमच्या दुर्बिणीत यांची किम्मत करता येईल कां?" वसंतराजने हिरे आपल्या हातात घेऊन पहात म्हटलं, "नक्की करता येईल. हे पूर्वीचे जुने हिरे आहेत. आजकाल मिळत नाहीत."

"आपण ही दुर्बिण योग्य किमतीला मला विकत घाल कां?" श्रीगुप्तने विचारले.

"हे अशक्य आहे. जगभरात अशी चारच उपकरणे आहेत." असं म्हणत रंगराजने आपल्या मोठ्या पेटीतून एक रंगीबेरंगी छोटी पेटी काढून ती उघडून म्हटलं, "आपण आपले हिरे या पेटीत ठेवा." श्रीगुप्तने त्या पेटीत हिरे ठेवले. वसंतराजने पटकन पेटी बंद केली. मोठ्या पेटीतून भस्म काढून ते श्रीगुप्तच्या हातांत देऊन म्हणाला, "तुम्ही तुमच्या हाताने हे भस्म पेटीवर शिंपडा." श्रीगुप्तने तसं केलं.

नंतर वसंतराजने मोठ्या पेटीला कुलूप लावले. छोटी पेटी श्रीगुप्तच्या हातांत देत तो म्हणाला, "उद्या याच वेळी येऊन मी माझी पेटी घेऊन जाईन." असं म्हणून तो निघून गेला.

वसंतराज सरळ रंगनाथच्या घरी पोचला. आणि त्याच्याकडे हिरे दिले. रंगनाथ म्हणाला, "हे हिरे विकून आपण अर्धे अर्धे पैसे घेऊया." रंगनाथ म्हणाला.

"एका काळात या हिऱ्यांमुळे खून पडलेले आहेत. पूर्ण कुटुंब नामशेष झालेलं आहे." वसंतराज म्हणाला.

"हे तुला कसं माहिती?" रंगनाथ म्हणाला.

"हे हिरे माझ्या आजोबांनी मिळवून आणून आपल्या वंशाचा विनाश ओढवून घेतला." वसंतराज म्हणाला.

"तर मग हे हिरे तूच घ्यायला पाहिजेस." दिलदारपणे रंगनाथ म्हणाला.

"रंगनाथ, तू असं का म्हणतोस? तुझ्यामुळे तर हे हिरे सांपडले. आमच्या कुटुंबाच्या विनाशानंतर या हिऱ्यांचे माझे आकर्षण संपले, हे विकून येणारे धन अर्धे अर्धे वाटून घेऊं." वसंतराज म्हणाला.

दुसऱ्या दिवशी श्रीगुप्तने पाण्यांतून छोटी पेटी काढून बघितली. त्यात साधे दगड निघाले. त्याच्याकडे आलेल्या नकली व्यापाऱ्याने भस्म देताना आपली हिऱ्याची पेटी बदलली, हे समजून श्रीगुप्त आपल्या नशीबाला दोष देऊं लागला.

रंगनाथने शहरांत एक मोठा महाल बांधला आणि व्यापारांत लाखो रुपये कमवले.







